Weekly 29 Nov 2026_Layout 1 11/28/2026 11:00 PM Page 1

महाराष्ट्रातील निर्भिड साप्ताहिक

रविवार जगमित्र

Jagmitra2010@gmail.com

www.jagmitra.com

बीड (महाराष्ट्र) | वर्ष ०२ रे | अंक ५६ | रविवार दि.२९ नोव्हेंबर २०२६ | PRGI.No.MHMAR/25/A3358 | पाने ६ | किंमत : ३ रू.

गेवराई महावितरणची तिजोरी कोणी लुटली?

कागदावर कामे, खिशात कोट्यवधी; गेवराई महावितरण घोटाळ्यात कंत्राटदार आणि एजन्सींना मोकळे रान का?

आता निलंबनाच्या पलीकडे जाऊन कारवाई दाखवा!

१३ कोटी ७० लाख रुपयांच्या कथित आर्थिक अनियमिततेचे प्रकरण हे केवळ सहा अधिकाऱ्यांच्या निलंबनाने संपणारे नाही. दोषी कोण, निधी कुठे गेला, आर्थिक नुकसान किती झाले आणि त्याची भरपाई कोण करणार, या प्रश्नांची उत्तरे मिळालीच पाहिजेत. पोलीस निरीक्षक बुद्धिराज सुकाळे, महावितरणचे वरिष्ठ अधिकारी आणि जिल्हा प्रशासनाने आता मौन सोडावे. चौकशीचा अहवाल, आर्थिक व्यवहारांचा तपशील आणि पुढील कारवाईची माहिती सार्वजनिक करावी; कारण प्रश्न केवळ सहा अधिकाऱ्यांच्या निलंबनाचा नाही, तर जनतेच्या १३ कोटी ७० लाख रुपयांच्या हिशोबाचा आहे!



बीड/जगमित्र न्यूज

गेवराई महावितरण उपविभागातील तब्बल १३ कोटी ७० लाख रुपयांच्या कथित आर्थिक अनियमिततेने संपूर्ण बीड जिल्ह्यात खळबळ उडवून दिली आहे. उच्चस्तरीय चौकशीनंतर सहा अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई झाल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, एवढ्या मोठ्या आर्थिक गैरव्यवहारात केवळ सहा अधिकाऱ्यांना निलंबित करून प्रशासनाची जबाबदारी संपते का? या कथित घोटाळ्याचा खरा सूत्रधार कोण, निधीचा प्रत्यक्ष लाभ कोणाला मिळाला आणि महत्त्वाच्या व्यक्तींवर कारवाई करण्यास विलंब का होत आहे? असे संतप्त सवाल आता उपस्थित केले जात आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, १९ नोव्हेंबर २०२६ रोजी अधीक्षक अभियंता प्रेमसिंग राजपूत, कार्यकारी अभियंता सुबोध डोंगरे, उपकार्यकारी अभियंता शाम मोरे, सहायक अभियंता शाम कुंभार, सहायक अभियंता चंद्रकांत प्रधान आणि कनिष्ठ अभियंता महेंद्र गुंजाळ या सहा अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. मात्र, या कारवाईनंतरही अनेक महत्त्वाचे प्रश्न अनुत्तरित आहेत.या संपूर्ण प्रकरणात चर्चेत असलेल्या मुच्छड नावाने ओळखल्या जाणाऱ्या व्यक्तीची नेमकी भूमिका काय आहे? १३ कोटी ७० लाख रुपयांच्या कथित अनियमिततेत त्याचा काही संबंध आहे का? असल्यास त्याची चौकशी कोण करणार? त्याच्याशी संबंधित आर्थिक व्यवहार, कंत्राटदारांशी असलेले संबंध आणि प्रशासकीय निर्णयांची सखोल तपासणी होणार का? केवळ चर्चांवरून कोणालाही दोषी ठरवता येणार नाही; मात्र, चर्चेत असलेल्या प्रत्येक संशयित भूमिकेची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. चौकशीत कोणाचाही मुलाहिजा राखला जाऊ नये, अशी मागणी जोर धरत आहे.१३ कोटी ७० लाख रुपयांचा निधी नेमका कोणत्या कामांसाठी मंजूर झाला होता? कोणत्या एजन्सींना ही कामे देण्यात आली आणि प्रत्यक्षात किती कामे पूर्ण झाली? कामांची गुणवत्ता, मोजमाप पुस्तिका, देयके आणि प्रत्यक्ष खर्च यांची स्वतंत्र पडताळणी झाली आहे का? कागदोपत्री कामे पूर्ण दाखवून प्रत्यक्षात ती अपूर्ण ठेवण्यात आली असतील, तर संबंधितांवर कारवाई कोण करणार? प्रत्येक कामाचे तांत्रिक ऑडिट, आर्थिक लेखापरीक्षण आणि संबंधित कंत्राटदारांच्या व्यवहारांची सखोल चौकशी झालीच पाहिजे.सहा अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई झाली असली, तरी या प्रकरणी फौजदारी जबाबदारी निश्चित करण्याची प्रक्रिया कुठपर्यंत पोहोचली आहे? चौकशीत गुन्ह्याचे पुरावे आढळले असतील, तर गुन्हे दाखल करण्याबाबत निर्णय का प्रलंबित आहे? संबंधित एजन्सी आणि कंत्राटदारांची चौकशी कधी होणार? एखाद्या व्यक्तीला राजकीय पाठबळ असल्याची चर्चा असेल, तर त्याचीही वस्तुनिष्ठ पडताळणी झाली पाहिजे. कायद्यापेक्षा कोणीही मोठे नाही, हे प्रशासनाने कृतीतून दाखवून देण्याची गरज आहे.



मुच्छड आणि कंत्राटदारांच्या आर्थिक व्यवहारांची ईडी किंवा एसआयटीमार्फत चौकशी होणार का?

निलंबन झाले, पण आर्थिक नुकसान वसूल कधी; पोलिसांचा तपास नेमका कुठे अडला?

पोलिसांची भूमिका काय? गुन्हे दाखल करण्यास विलंब का?

गेवराई पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बुद्धिराज सुकाळे यांनी या प्रकरणाकडे केवळ निलंबनापुरते मर्यादित न पाहता, संपूर्ण आर्थिक व्यवहारांची साखळी तपासावी. दोषी आढळणाऱ्या अधिकारी, कर्मचारी, एजन्सी आणि कंत्राटदारांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी. तसेच, या प्रकरणात राजकीय हस्तक्षेपाचे आरोप असतील, तर त्यांचीही स्वतंत्र चौकशी करावी. शेतकऱ्यांच्या, सर्वसामान्य ग्राहकांच्या आणि शासनाच्या पैशाचा हिशोब मागणे हा जनतेचा अधिकार आहे. १३ कोटी ७० लाखांचा कथित घोटाळा नेमका कसा झाला, त्यातून कोणाला फायदा झाला आणि सरकारी तिजोरीला किती नुकसान झाले, याची स्पष्ट माहिती जनतेसमोर आलीच पाहिजे.आणि दोषीवर गुन्हे दाखल झालेच पाहिजे

प्रशासनाला जनतेचे थेट सवाल...

१३ कोटी ७० लाख रुपयांच्या कथित अनियमिततेतील सर्व जबाबदार व्यक्तींची नावे जाहीर होणार का? चर्चेत असलेल्या मुच्छडच्या भूमिकेची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी होणार का? संबंधित एजन्सी व कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्याबाबत नियमांनुसार निर्णय कधी होणार? आर्थिक गैरव्यवहाराचे पुरावे आढळल्यास संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल होणार का? कथित घोटाळ्यातील आर्थिक व्यवहार आणि लाभार्थ्यांची संपूर्ण साखळी तपासली जाणार का? या प्रकरणात कोणत्याही राजकीय व्यक्तीचा हस्तक्षेप असल्यास त्याची चौकशी होणार का?

खासदार बजरंग सोनवणे साहेब, गद्दार होऊ नका!

काँग्रेसचे जि.उपाध्यक्ष बहादूर भाई यांचा परिसीमन विधेयकावरून खासदारांना इशारा

बीड/प्रतिनिधी



बीडचे खासदार बजरंगबप्पा सोनवणे यांनी परिसीमन विधेयकाच्या मुद्द्यावर काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या भूमिकेसोबत ठामपणे राहावे, असे आवाहन काँग्रेसचे बीड जिल्हा उपाध्यक्ष बहादूर भाई यांनी केले आहे.

बीड लोकसभा मतदारसंघातील मतदारांनी भाजपविरोधात आणि महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून बजरंग सोनवणे यांना मतदान करून विजयी केले. काँग्रेस आणि शिवसेना (उबाठा) यांच्या पाठिंब्यामुळेच आपण निवडून आला आहात, याची जाणीव ठेवावी, असे बहादूर भाई यांनी म्हटले आहे.

परिसीमन विधेयकाला विरोध करायचा असेल, तर खासदारांनी प्रथम आपल्या पदाचा राजीनामा द्यावा आणि त्यानंतर स्वतःच्या पक्षाच्या ताकदीवर निवडणूक लढवून विजयी होऊन दाखवावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

''खासदार साहेब, जनतेने भाजपविरोधात मतदान केले आहे. त्यामुळे काँग्रेस आणि शिवसेना (उबाठा) यांच्यासोबत राहून जनतेच्या विश्वासाला जागा. गद्दार होऊ नका!'' असा इशारा बहादूर भाई यांनी दिला आहे.

सिरसाळा परिसरातील रस्त्यांची दयनीय अवस्था; नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत कधी होणार?

खड्डेमय रस्त्यांमुळे दुचाकीस्वार त्रस्त; एका महिलेच्या स्पष्ट शब्दांनी राजकीय गुलामगिरीवर मार्मिक भाष्य!

सिरसाळा/प्रतिनिधी

आज पोहणेरकडे जात असताना सिरसाळा परिसरातील रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था पाहायला मिळाली. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून खडी पूर्णपणे उघडी पडली आहे. अशा रस्त्यावर दुचाकी चालवणेही जिकिरीचे झाले आहे. मग चारचाकी वाहने, अवजड वाहने आणि शेतकऱ्यांच्या बैलगाड्यांची अवस्था काय असेल? विशेष म्हणजे या खड्डेमय रस्त्यांवरून जाणाऱ्या मुक्या जनावरांचे हाल कोणाच्या लक्षात येणार?



प्रवासादरम्यान समोरच एका दुचाकीवरून दांपत्य जात असताना त्यांची मोटारसायकल खड्ड्यात बंद पडली. हे पाहून मी त्यांना आवाज देत, ताईला बाजूला करून गाडी पुढे घेऊन चालू करा, असे सांगितले. मात्र, त्या महिलेने माझ्याजवळ येऊन जे काही सांगितले, ते केवळ एका व्यक्तीचे मत नव्हते, तर संपूर्ण परिसरातील नागरिकांनी आत्मपरीक्षण करण्यासारखे वास्तव होते.

त्या माऊलीचे शब्द मनाला चटका लावणारे होते. त्या म्हणाल्या, ''या भागातील जनता राजकीय गुलामगिरीत आहे आणि त्यामध्ये आम्हीही आहोत!''

अवघ्या एका वाक्यात त्यांनी या भागातील राजकीय परिस्थितीवर नेमके बोट ठेवले. रस्त्यांची दुरवस्था, मूलभूत सुविधांचा अभाव आणि नागरिकांची होणारी गैरसोय याबाबत जबाबदार लोकप्रतिनिधींना जाब विचारण्याऐवजी आपणच राजकीय गुलामगिरी स्वीकारली आहे का, असा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे.

लोकशाहीमध्ये जनता हीच खरी मालक असते. लोकप्रतिनिधी जनतेच्या सेवेसाठी असतात; जनता त्यांच्या (पान २ वर)

खा.बजरंग बप्पा सोनवणे दिशा बैठकीत राष्ट्रीय महामार्गांच्या दुरवस्थेबाबत ठोस निर्णय घेणार का?

जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या बैठका केवळ कागदोपत्री; महामार्गांवरील खड्डे, भेगा आणि अपघातांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष!

बीड/प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील प्रलंबित विकासकामे आणि रस्ते सुरक्षेच्या प्रश्नांना गती देण्यासाठी खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार, दि. ३० रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात दिशा आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत जिल्ह्यातील रस्ते सुरक्षेच्या प्रश्नांवरही चर्चा होणार आहे. आपल्या समस्या, आमचा पाठपुरावा या भूमिकेतून खासदारांच्या कार्यालयाने नागरिकांना आपल्या भागातील रस्त्यांसंदर्भातील तक्रारी ९४७७१६१६१६ या व्हॉट्सॲप क्रमांकावर पाठविण्याचे आवाहन केले आहे. नागरिकांचे प्रश्न बैठकीत मांडून त्यावर ठोस कारवाईसाठी पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.या आवाहनाला प्रतिसाद देत सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र राज्याचे मुख्य प्रचारप्रमुख डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गांच्या दुरवस्थेचा गंभीर प्रश्न उपस्थित केला आहे.

बीड जिल्ह्यातून जाणाऱ्या अहमदपूर ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ डी, खामगाव ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ सी आणि पैठण ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५२ या मार्गांवरील कामे अनेक ठिकाणी रखडलेली



असून, निकृष्ट दर्जाचे काम, रस्त्यांवरील भेगा, तडे आणि मोठमोठे खड्डे यामुळे वाहनधारकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या महामार्गांवर वारंवार अपघात होऊन अनेकांना जीव गमवावा लागल्याचा आरोप डॉ.गणेश ढवळे यांनी केला आहे.

या गंभीर प्रश्नांबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि जिल्हा प्रशासनाला वेळोवेळी निवेदने देऊन आंदोलने करण्यात आली. मात्र, अद्यापही ठोस उपाययोजना झालेल्या नाहीत. त्यामुळे आगामी दिशा बैठकीत खासदार बजरंग सोनवणे या प्रश्नांवर केवळ चर्चा न करता संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार (पान २ वर)

दुष्काळाच्या सावटात दिंद्रूडच्या विद्यार्थ्यांनी घेतली पाणी वाचवण्याची शपथ

दिंद्रूड/प्रतिनिधी



मराठवाड्यावर पुन्हा एकदा दुष्काळाचे गडद सावट आहे. पावसाने ओढ दिल्याने विहिरी, बोअर कोरड्या पडत आहेत, पाणी पातळी खालावली आहे. अशा गंभीर पार्श्वभूमीवर चंद्रभागा पोदार लर्न स्कूल, दिंद्रूड येथे आज विद्यार्थ्यांनी ''पाणी हेच जीवन आहे, पाणी वाचवा'' अशी शपथ घेतली.

सकाळच्या परिपाठात सर्व विद्यार्थ्यांनी एका आवाजात शपथ घेतली. पाणी वाया घालवणार नाही, नळ बंद ठेवणार, टँकरचे पाणी जपून वापरणार, असा संकल्प यावेळी करण्यात आला.

दुष्काळात एका हंडाभर पाण्यासाठी महिलांना मैलोन् मैल पायपीट करावी लागते, शेतकऱ्यांच्या पिकांसोबत जनावरांनाही पाण्यासाठी वणवण करावी लागते, ही विदारक परिस्थिती शिक्षकांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितली. पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवला तरच पुढचा उन्हाळा सुसह्य होईल, असे आवाहन करण्यात आले. यावेळी शाळा अध्यक्ष अतुल ठोंबरे साहेब म्हणाले, ''दुष्काळ ही निसर्गाची नाही, तर आपल्या निष्काळजीपणाचीही शिक्षा आहे. ही शपथ फक्त शाळेपुरती नाही, तर घराघरात पोहोचली पाहिजे. (पान २ वर)

महिला बचत गटांच्या उत्पादनांना मिळणार हक्काची बाजारपेठ

शिवसंग्राम अध्यक्ष डॉ.ज्योती मेटे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

बीड/प्रतिनिधी

महिला बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनांना कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध व्हावी, महिलांच्या उत्पादनांना स्वतंत्र ब्रँड ओळख मिळावी आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्यासाठी बीड शहरात सुमारे २० कोटी रुपये खर्चून 'उमेद मॉल' (जिल्हा विक्री केंद्र) उभारण्यास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी या मॉलच्या उभारणीसाठी केलेल्या सातत्यपूर्ण मागणी



व पाठपुराव्याला यामुळे महत्त्वपूर्ण यश मिळाले आहे. बीड शहरात महिला बचत (पान २ वर)

आज परळीत मराठवाडा जनता विकास परिषदेच्या केंद्रीय कार्यकारिणीची बैठक

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेल्या मराठवाडा जनता विकास परिषदेच्या केंद्रीय कार्यकारी मंडळाची महत्त्वपूर्ण बैठक रविवार, दिनांक २९ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता परळी-गंगाखेड रोडवरील वडगाव (दा.) येथील श्री. शंभू महादेव मंदिर, 'मातीची माया' कृषी पर्यटन केंद्र, नरवणे यांच्या शेतात आयोजित करण्यात आली आहे.

या बैठकीस केंद्रीय कार्यकारिणी मराठवाडा जनता



विकास परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे, माजी आमदार श्री.डी.के. देशमुख,नगराध्यक्षा सौ.पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी,अखिल भारतीय किसान सभा राज्य सहसचिव श्री.अजय बुरांडे,माझी नगराध्यक्ष श्री.बाजीराव धर्माधिकारी, म.ज.वि.प.सचिव प्रा.अर्जुन जाधव, जिल्हा अध्यक्ष राजेंद्र आगवान,उपाध्यक्ष श्री.शिरीष देशमुख,बीड व परभणी जिल्ह्याचे सचिव प्रा. सुमंत गायकवाड व पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

बैठकीमध्ये परिषदेच्या मागील कामकाजाचा आढावा, संस्थेच्या जमा-खर्चास मान्यता, जिल्हा व महानगर शाखांचे कार्य अहवाल, संस्थेची संघटनात्मक पुनर्रचना व नवीन विश्वस्तांची नियुक्ती यासह विविध महत्त्वपूर्ण (पान २ वर)

page 2_Layout 1 11/28/2026 11:41 PM Page 1

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

गोविंदसिंह राजपुत (जिल्हा प्रतिनिधी) मो. 9921876500 PRGI.NO.MHMAR/26/A0224

धाराशिव जिल्हा आवृत्ती रविवार दि.२९ नोव्हेंबर २०२६ पान नं. २

आता संभाजी नगर, पुणे, मुंबई येथे जाण्याची गरज नाही

मुळव्याध : संडासच्या जागी आग होणे, दुखणे, कोंब येणे, रक्त जाणे, जागा लहान होणे, फिशर

सांधेदुखी : पाठीच्या मणक्याचे त्रास, चमक मारणे, गॅप पडणे, गुडघे दुखी, टाचदुखी, मानपाठ, कंबरदुखी, हातपायाला मुंग्या येणे, नस दबणे, डोकेदुखी, अंग दुखणे,

स्त्रीयांचे सर्व आजार : मुल बाळ होत नसल्यास वजन जास्त असणे, केस गळणे, चक्करयेणे, घबराहट, बैचेनी, झोप न येणे, पचनाचे व पित्ताचे त्रास, पोटदुखी, हाडीताप, मुतखडा, त्वचारोग, ॲलर्जि सर्दी, खोकला, दमा.

रविवारी दवाखाना बंद राहील

डॉ.रविंद्र ईटके आयुर्वेद व पंचवर्ग तज्ञ (पुणे)

डॉ.सौ.भाग्यश्री ईटके स्त्रीरोग व आयुर्वेद तज्ञ

वेळ : स. ११ ते २.३० संध्या : ६ ते ८

सोनोग्राफी सेंटर समोर पदमावती गल्ली, परळी. वै

मो.9822816010, 7588596838

विश्वश्री : आयुर्वेद हॉस्पिटल व पंचकर्म केंद्र

नशामुक्त विकसित भारताच्या निर्मितीसाठी युवकांनी पुढाकार घ्यावा; अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील यांचे आवाहन

धाराशिव/जिमाका

देशाच्या विकासात युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. सशक्त,निरोगी आणि विकसित राष्ट्राच्या उभारणीसाठी युवा पिढीने व्यसनांपासून दूर राहून आपली ऊर्जा विधायक कार्यासाठी वापरावी.केंद्र शासनाच्या नशामुक्त विकसित भारताच्या संकल्पनेला मूर्त स्वरूप देण्यासाठी जिल्ह्यातील युवकांनी पुढाकार घेऊन नशामुक्त राष्ट्रनिर्मितीत सक्रिय सहभाग नोंदवावा,असे आवाहन अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील यांनी केले.

'नशामुक्त युवा -- विकसित भारतासाठीफ या संकल्पनेवर आधारित विकसित भारत नेतृत्व संवाद (तइधडऊ) २०२७ अंतर्गत जिल्हास्तरीय युवा महोत्सव २०२६-२७ चे आयोजन आज धाराशिव येथील पुष्पक मंगल कार्यालयात करण्यात आले. क्रीडा व युवक सेवा संचा-लनालय,महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,धाराशिव यांच्या वतीने आयोजित या महोत्सवाचे उद्घाटन अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील यांच्या हस्ते झाले.यावेळी त्या बोलत होत्या. युवक ही देशाची मोठी शक्ती आहे.या शक्तीला योग्य दिशा मिळाल्यास राष्ट्राच्या प्रगतीला अधिक गती मिळू शकते. नशामुक्त समाजाच्या निर्मितीसाठी युवकांचा सक्रिय सहभाग आवश्यक असून,



जिल्ह्यातील युवा पिढीने या सामाजिक परिवर्तनात महत्त्वाची भूमिका बजावावी, असा संदेश या महोत्सवाच्या माध्यमातून देण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हा क्रीडा अधिकारी सुप्रिया गाढवे यांनी प्रास्ताविक केले. जिल्ह्यातील युवक-युवतींच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा,त्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन मिळावे,तसेच त्यांच्यामध्ये सामाजिक जाणीव आणि राष्ट्रनिर्मितीची भावना विकसित व्हावी,या दृष्टीने युवा महोत्सवाचे आयोजन महत्त्वपूर्ण ठरते.

युवकांच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ

जिल्हास्तरीय युवा महोत्सवात जिल्ह्यातील विविध शाळा आणि महाविद्यालयांमधील युवक-युवतींनी सहभाग नोंदविला.युवा पिढीच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासोबतच नशामुक्तीचा संदेश समाजाच्या विविध घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी हा महोत्सव एक प्रभावी व्यासपीठ ठरला.युवकांच्या प्रतिभेला संधी देतानाच त्यांच्यामध्ये सामाजिक बांधिलकीची भावना रुजविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. युवा महोत्सवासाठी परीक्षक म्हणून प्रा.मिलिंद माने,डॉ. उषा कांबळे,माधुरी सलगर, वंदना कुलकर्णी,प्रा.प्रशांत गुरव,राजेंद्र भोसले,एस. टी. गांगुर्डे, एस.डी.भोसले, योगेश अत्रे,नितीन तुपसमलिंदर आणि अविनाश ताटे उपस्थित होते.

संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करून बौद्ध धम्म पद्धतीने मंगल परिणय सोहळा उत्साहात संपन्न

वागदरी/किशोर धुमाळ

दिनांक २६ नोव्हेंबर २२६ रोजी भारतीय संविधान दिनाच्या ७७ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून आयोजित गवळी आणि गायकवाड यांचा मंगल परिणय सोहळा भारतिय संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करून बौद्ध धम्म पद्धतीने अत्यंत मंगलमय अशा वाता-वरणामध्ये संपन्न झाला.

याबाबत सविस्तर वृत्त असे की आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते पितांबर विश्वंभर गवळी राहणार मुर्टा तालुका तुळजापूर जिल्हा धाराशिव यांचे सुपुत्र चिरंजीव सागर व मिलिंद रामा गायकवाड रा.अचलेर ता. लोहारा यांची कन्या कुमारी निशा यांचा मंगल परिणय (शुभ विवाह) सोहळा दि.२६ नोव्हेंबर २०२६ रोजी मौजे मुर्टा येथून जवळच अंतरावर असलेल्या ऐतिहासिक नळदुर्ग येथिल श्री अंबाबाई देवस्थान ट्रस्ट च्या सभागृहात मोठ्या आनंदाने व उत्साही वाता-वरणात संपन्न झाला.



दि.२६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय घटनेचे शिल्पकार परमपूज्य बोधिसत्व डॉ.बाबासाहेबआंबेडकर यांनी लिहिलेल्या स्वतंत्र भारत देशाच्या संविधानाला भारतीय नागरिकांनी स्वतः प्रत अर्पण करून अंगीकृत आणि अधिनियमित केले आहे. म्हणजेच भारतीय संविधानाला घटना समितीने अंतिम मंजुरी देऊन हे संविधान देशातील तमाम नागरिकांनी स्वीकारले आहे. म्हणून दि.२६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून देशभरात सर्वत्र साजरा केला जातो.या संविधान दिनाचे औचित्य साधून हा मंगल परिणय सोहळा आयोजित केला होता हा एक योगायोग असे म्हणावे लागेल.

त्यामुळे या मंगल परिणयाच्या धम्म संस्कार विधीला सुरुवात करण्यापुर्वी विधीकर्ते एस.के.गायकवाड सह उपस्थित सर्व ग्रामस्थ,महिला,युवा कार्यकर्ते, मान्यवर मंडळी, आदिनी सामुदायिक रित्या संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करून अत्यंत मंगलमय अशा वातावरणामध्ये हा मंगल परिणय सोहळा पार पडला. या मुळे समाज परिवर्तन चळवळीला एक वेगळी दिशा मिळाली आसून प्रत्येक नागरिकाला आपल्याला घटनात्मक दृष्ट्या मानवी हक्क व मूलभूत अधिकार मिळवून देणाऱ्या भारतीय संविधानाचा सन्मान करण्याची जाणीव झाली.

वागदरी येथे विविध ठिकाणी ७७ वा संविधान दिन साजरा

वागदरी (किशोर धुमाळ):

तुळजापूर तालुक्यातील वागदरी येथे ग्रामपंचायती सह विविध ठिकाणी ७७ वा संविधान दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

येथिल ग्रामपंचायतीच्या वतीने ७७ वा संविधान दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर घटना समितीकडे संविधान सुपूर्द करतअसलेल्या प्रतिमेचे व संविधन प्रास्ताविकेच्या आणि भारत मातेच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी संविधानाच्या प्रस्ताविकेचे सामुदायकरीत्या वाचन करण्यात आले.या वेळी माझी सरपंच तथा विद्यमान ग्रा.प.सदस्य ज्ञानेश्वर पाटील,माजी उपसरपंच तथा ग्रा.प. सदस्या मिनाक्षी महादेव बिराजदार,सुरेखा भालचंद्र यादव,उमेदच्या सिआरपी विद्या राजेंद्र बिराजदार कृषी सखी कोमल लक्ष्मण झेंडारे,अशा कार्यकर्ती पार्वती बिराजदार, सामाजिक कार्यकर्ते नामदेव यादव,पत्रकार एस.के. गायकवाड सह ग्रामस्थ



उपस्थित होते.

तसेच येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वागदरी येथे शाळेचे मुख्याध्यापक बी.बी. सगर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून सामुदायिक रित्या संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन करण्यात आले. यावेळी शालेय विद्यार्थ्यांची भाषणे झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सहशिक्षक तानाजी लोहार यांनी केले तर आभार प्रदर्शन एन.एन.काळे सर यांनी केले यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष योगेश सुरवसे अंगणवाडीच्या ताई पद्मिनी बाई पवार,मदतनीस रूपाली जाधव सह विद्यार्थी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

येथील भीम नगर येथे पंचशील बुद्ध विहार समाज मंदीरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटीच्या वतीने ७७ व्या संविधान दिनाचे औचित्य साधून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रारंभी रमाई महिला बचत गटाच्या सचिव गिताबाई झेंडारे व रिपाइं (आठवले)धाराशिव जिल्हा सचिव तथा पत्रकार एस.के.गायकवाड,अनिल वाघमारे,भीम शाहीर शिवाजी वाघमारे,यांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून सामुदायिक रित्या बुद्ध वंदना घेऊन संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले.या प्रसंगी शालेय विद्यार्थिनींची संविधानावर आधारित भाषण झाली. या वेळी बोलताना एस.के. गायकवाड म्हणाले की या देशातील सामान्य माणूस केंद्रस्थानी ठेवून भारतीय घटनेचे शिल्पकार परमपूज्य बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र भारताचे संविधान निर्माण केले.



करारऐवजी करारीपणा!

या शुल्कवाढीचे निमित्त म्हणून झालेल्या आरोपांपुढे भारताने मान तुकवली नसली, तरी आरोप खोडून काढणाऱ्या आवाजात ठामपणा आणि अपेक्षित आक्रमकता नाहीः व्यापार शुल्काचा तडाखा २५ टक्क्यांपर्यंत बसू शकतो, पण करार केलात तर १७ टक्केः हे १७ टक्क्यांचे गाजर सौदेबाजीसारखे वाटते खरे. पण प्रत्यक्षात तो डोनाल्ड ट्रम्प यांनी दाखवलेला धाकच आहे. दुसऱ्या बाजूने पाहिले तर न्यायालयीन तसेच राजकीय अडथळ्यांच्या दबावातून अमेरिकी प्रशासनाने टाकलेले हे पाऊलही म्हणता येईल. अमेरिकेच्या व्यापार प्रतिनिधी कार्यालयाने भारतीय मालावर जुलमी २५ टक्के शुल्काचा प्रस्ताव मांडला असून व्यापार करार झाल्यास तो दर १७ टक्क्यांवर येईल. ही घोषणा ताजी असली, तरी तिचा पोत जुनाच आहे. त्यात धक्का बसण्यासारखे काही नाही. पण या घोषणेमागील अर्थ भारताने गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. मुळात जवळपास दोन वर्षे चर्चेचे गुऱ्हाळ सुरू राहिल्यानंतरही अमेरिकेशी व्यापार कराराची प्रक्रिया आजघडीला अधांतरीच आहे. कराराची गाडी पुढे सरकत असल्याचे दोन्ही बाजूंनी रंगवले जाणारे आशावादी चित्र हे निव्वळ फसवे आहे या मलोकसत्ताफच्या भूमिकेचा ताजा प्रत्यय बुधवारच्या या घोषणेने पुन्हा दिला आहे. ताज्या घडामोडीचा चिकित्सक परामर्श घेणे म्हणूनच अपरिहार्य ठरते. या घोषणेचा कळबिंदू समजून घेतला, तर तिचे गांभीर्य अधिक स्पष्ट होते. अमेरिकेचे व्यापार प्रतिनिधी जेमिसन ग्रीर यांचे त्यासंबंधाने विधानही म्हणूनच लक्षणीय. एरवी ट्रम्प यांच्या बोलण्यावागण्याला तर्काची कसोटी लावणे व्यर्थच. पण या वेळच्या घोषणेमागे तर्क नसला तरी गणित नक्कीच आहे, ते कायदेशीर आहे. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने ट्रम्प प्रशासनाचे प्रत्याघाती (रेसिप्रोकल) अथवा जशास तसे शुल्क रद्दबातल ठरवल्यानंतर हा प्रस्ताव आला आहे. जुन्या शुल्कांचा कायदेशीर आधार गेल्यावर प्रशासनाने व्यापार कायदा १९७४ च्या कलम ३०१ चा मार्ग अनुसरला आहे. यातून भारतासह, चीन, युरोपीय महासंघ आणि आशियातील प्रमुख देशांवर नव्या आयात शुल्काची कुऱ्हाड उगारली गेली आहे. भारताच्या बाबतीत या शुल्काचा आकडा थेट २५ टक्क्यांवरून १७ टक्क्यांपर्यंत खाली आणण्याचे आमिषही दाखवण्यात आले आहे. यात जागतिक व्यापाराला आपल्या अटींवर वाकवण्याची ट्रम्पछाप मुत्सद्देगिरी स्पष्टपणे आहेच. पण ती अमेरिकेतील न्यायालयीन आणि राजकीय पेचाच्या पार्श्वभूमीवर आता हातघाईवर आली असे म्हणावे लागेल.

पान १ वरून...

सिरसाळा

मर्जीवर जगण्यासाठी नाही. रस्ते चांगले असावेत, मूलभूत सुविधा मिळाव्यात आणि विकासकामे व्हावीत, ही जनतेची भीक नाही, तर हक्काची मागणी आहे. आता तरी नागरिकांनी जागे व्हावे! राजकीय निष्ठेपेक्षा आपल्या गावाचा विकास, आपल्या मुलांचे भविष्य आणि आपल्या जनतेची सुरक्षितता महत्त्वाची मानावी. कारण रस्त्यांवरील खड्डे केवळ विकासकामांचे अपयश दाखवत नाहीत, तर व्यवस्थेला प्रश्न विचारण्याची गरजही अधोरेखित करतात. शेवटी त्या महिलेचा एकच मंत्र लक्षात ठेवण्यासारखा आहे... राजकीय गुलामगिरी झुगारून द्या आणि आपल्या हक्कांसाठी आवाज उठवा! बाकी सर्व सुज्ञ नागरिकांनी ओळखून घ्यावे.

खा.बजरंग बप्पा

धरून दुरुस्तीची कालमर्यादा निश्चित करणार का, असा सवाल डॉ. ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या वांझोट्या बैठका; ठोस उपाययोजना कधी?

जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली नियमितपणे होणाऱ्या जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या बैठका केवळ कागदोपत्री सोपस्कार ठरत असल्याचा आरोप डॉ.गणेश ढवळे यांनी केला आहे. रस्ते वाहतूक सुरक्षा, अपघात कमी करणे, अपघातप्रवण क्षेत्रांची तपासणी, वेगमर्यादा आणि मद्यधुंद अवस्थेत वाहन चालविण्यामुळे होणारे अपघात अशा विषयांवर चर्चा केली जाते. मात्र, रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे होणाऱ्या अपघातांचा प्रश्न गांभीर्याने मांडला जात नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. राष्ट्रीय महामार्गांवरील खड्डे, भेगा आणि निकृष्ट कामांमुळे होणाऱ्या अपघातांची जबाबदारी कोणाची? रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत प्रत्यक्ष रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत निर्णय होत नसतील, तर अशा बैठकांचा उपयोग काय? असा सवाल उपस्थित करत आगामी दिशा बैठकीत राष्ट्रीय महामार्गांच्या दुरुस्तीचा कालबद्ध कार्यक्रम जाहीर करावा, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

.....

शपथ

''पाणी वाचवा ही घोषणा नाही, ही काळाची गरज आहे. आमच्या शाळेतील प्रत्येक विद्यार्थी आजपासून पाण्याचा पहारेकरी असेल.'' प्रिन्सिपल निलेश नींदाने सर म्हणाले, ''दुष्काळी भागातील मुलांना पाण्याचे महत्त्व शिकवण्याची गरज नाही, ते रोज अनुभवतात. पण आज आम्ही त्यांना पाणी वाचवण्याचा संकल्प दिला आहे. प्रत्येक विद्यार्थी आता पाणी दूत म्हणून काम करेल. शाळेतील प्रत्येक नळावर आमचा पाणी वाचवा फलक आहे .'' दुष्काळाच्या काळात विद्यार्थ्यांनी घेतलेल्या या शपथेचे पालक व ग्रामस्थांकडून विशेष कौतुक होत आहे.

.....

डॉ.ज्योती मेटे

गटांसाठी स्वतंत्र मॉल उभारण्यात यावा, अशी मागणी डॉ. ज्योती मेटे यांनी तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्याकडे केली होती. त्यानंतर दि. ३० जुलै रोजी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. सुनेत्राताई अजित पवार यांनाही यासंदर्भात निवेदन देऊन या प्रकल्पाची आवश्यकता आणि महत्त्व त्यांच्या निदर्शनास आणून दिले होते. केवळ निवेदनापुरते मर्यादित न राहता जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडेही त्यांनी वेळोवेळी सातत्याने पाठपुरावा केला. या प्रयत्नांना आता यश आले असून, सुमारे २० कोटी रुपयांच्या निधीतून बीडमध्ये उमेद मॉल साकारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या मॉलमुळे महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना एकाच ठिकाणी विक्रीसाठी व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. महिलांच्या उत्पादनांना थेट ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळणार असून, त्यांच्या कष्टाला योग्य मोबदला आणि उद्योगाला नवी दिशा मिळण्यास मदत होणार आहे. विशेष म्हणजे, पर्यावरणपूरक ग्रीन बिल्डिंग संकल्पनेवर आधारित या मॉलची उभारणी करण्यात येणार असल्याने महिला सक्षमीकरणासोबतच बीड शहराच्या विकास आणि वैभवातही भर पडणार आहे. महिला बचत गटांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सकारात्मक भूमिका घेऊन उमेद मॉल प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करून देण्याच्या निर्णयाबद्दल डॉ. ज्योती मेटे यांनी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री ना. सु-नेत्राताई अजित पवार आणि महायुती सरकारचे आभार व्यक्त केले आहेत. महिलांच्या मेहनतीला बाजारपेठ, त्यांच्या उत्पादनांना ओळख आणि उद्योजकतेला व्यापक व्यासपीठ मिळवून देणारा उमेद मॉल हा बीड जिल्ह्यातील महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

कार्यकारिणीची बैठक

विषयांवर चर्चा होणार आहे. विशेषतः मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती, भीषण पाणीटंचाई, नदीजोड प्रकल्प आणि पाण्याच्या शाश्वत नियोजनाबाबत सविस्तर विचारमंथन होणार आहे. मराठवाड्याच्या विकासातील प्रलंबित प्रश्न, सिंचन, शेती, रोजगार, शिक्षण, आरोग्य तसेच रेल्वे व रस्ते वाहतूक यांसारख्या मूलभूत सुविधांबाबतही ठोस भूमिका व कृती आराखडा निश्चित करण्याच्या दृष्टीने चर्चा व निर्णय होणार आहेत. मराठवाड्याच्या विकासासाठी लोकाभिमुख भूमिका घेऊन विविध प्रश्न शासन दरबारी मांडण्याचे कार्य परिषद सातत्याने करीत आहे. या बैठकीच्या माध्यमातून विभागाच्या विकासासाठी संघटनात्मक पातळीवर पुढील दिशा निश्चित होणार आहे. या बैठकीस केंद्रीय कार्यकारिणी सदस्यांसह मराठवाड्यातील सर्व जिल्हा व महानगर शाखांचे अध्यक्ष, सचिव आणि प्रमुख पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मराठवाडा जनता विकास परिषदेचे परळी-वैजनाथ शाखेचे प्रमुख मार्गदर्शक जी. एस. सौंदळे, अध्यक्ष चेतन सौंदळे, डॉ. वसंतराव मुंडे,श्रीकांत पाथरकर,अनंत इंगळे तसेच शाखेच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

शेवटचा पानावरून...

भूमिपूजन सोहळा

वातावरण आहे. पाणी अडवा, पाणी जिरवा या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीची जोड देत गावाला दुष्काळमुक्त करण्याच्या दिशेने सुरू झालेला हा उपक्रम भविष्यात उमरी गावासाठी महत्त्वपूर्ण ठरेल, अशी आशा ग्रामस्थांनी व्यक्त केली.

पाणी अडवणार, गाव दुष्काळमुक्त करण्याचा निर्धार!

उमरी गावात सरस्वती नदीच्या खोलीकरण व रुंदीकरणाचे काम सुरू करण्यामागे केवळ नदीपात्र मोठे करणे हा उद्देश नसून गावाच्या भविष्यातील पाणीप्रश्नावर कायमस्वरूपी उपाय शोधण्याचा प्रयत्न आहे. पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी बंधाऱ्याच्या माध्यमातून नदीपात्रात साठवून ठेवण्याचे नियोजन आहे.

या उपक्रमाचे प्रमुख उद्देश :

सरस्वती नदीच्या पात्राची खोली व रुंदी वाढवणे. बंधाऱ्याच्या माध्यमातून पावसाचे पाणी अडवून साठवणे. गावासाठी पाण्याचा साठा उपलब्ध करून देणे. भूजलपातळी वाढण्यास मदत करणे. विहिरी व बोअरवेलच्या पाणीपातळीला आधार मिळवणे. शेती आणि गावाच्या भविष्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी प्रयत्न करणे. ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक मयंक गांधी यांच्या पुढाकारातून सुरू झालेला हा जलसंधारण उपक्रम उमरी गावाच्या दुष्काळमुक्तीच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल ठरत आहे. माजलगाव तालुक्यातील इतर गावांसाठीही उमरीचा हा जलसंधारण उपक्रम प्रेरणादायी ठरू शकतो!

.....

अभिवादन

होते. यावेळी प्रा. रायभोळे एम. डी., प्रा. सचिन डहाळे, श्री. जगताप प्रल्हाद, नरहरी मुंडे, रुक्षराज आंधळे. राजीव तांदळे, ब्रह्मनाथ कांबळे, शेख अब्दुल यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. बी. डी. मुंडे म्हणाले की, ''सामाजिक क्रांतीची मशाल पेटवणारे महात्मा ज्योतिबा फुले हे भारतीय समाजव्यवस्थेला नवी दिशा देणारे महान विचारवंत आणि समाजसुधारक होते. त्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षणाचा प्रसार केला. स्त्रीशिक्षणासाठी सावित्रीबाई फुले यांच्या साथीने ऐतिहासिक कार्य केले. समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद, अस्पृश्यता आणि अन्यायाविरुद्ध त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांचे विचार आजही समाजासाठी प्रेरणादायी आहेत.''पुढे त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाचे महत्त्व, सामाजिक समता, बंधुता, स्त्री-पुरुष समानता आणि संविधानिक मूल्ये आत्मसात करण्याचे आवाहन केले. महात्मा फुले यांच्या विचारांचा केवळ गौरव न करता ते आपल्या आचरणात आणणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमातून महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि क्रांतिकारी कार्याला उजाळा देण्यात आला. उपस्थितांनी त्यांच्या विचारांचे स्मरण करून विनम्र अभिवादन केले.

.....

ॲड.जीवनराव देशमुख

विभागाकडून ऑनलाइन नोंदणी आणि परमिट देण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाते, तर दुसरीकडे प्रत्यक्षात बियाणेच उपलब्ध होत नाही. त्यामुळे कृषी विभाग असून अडचण आणि नसून अडचण, अशी अवस्था निर्माण झाली आहे. परमिट मिळवूनही बियाणे मिळत नसेल तर शेतकऱ्यांनी पेरणी करायची तरी कशी, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. आधीच यंदाच्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. खरीप हंगाम पूर्णपणे हातातून गेल्याने शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. आता रब्बी हंगामात हरभऱ्याच्या पिकातून काहीतरी आर्थिक आधार मिळेल, अशी अपेक्षा असताना बियाण्यांच्या टंचाईमुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. पेरणीचा योग्य कालावधी निघून गेल्यास त्याचा उत्पादनावरही परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. बियाणे उपलब्ध करा, अन्यथा रुमणे घेऊन आंदोलन करणार परळी तालुक्यातील शेतकऱ्यांना तातडीने हरभरा बियाणे उपलब्ध करून द्यावे. ऑनलाइन नोंदणी करून परमिट दिल्यानंतर बियाणे पुरवण्याची जबाबदारीही संबंधित यंत्रणेने पार पाडली पाहिजे. महाबीजकडून तातडीने बियाण्यांचा पुरवठा करून शेतकऱ्यांची गैरसोय दूर करावी. अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने शेतकऱ्यांना सोबत घेऊन रुमणे हातात घेत आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा माजी शहराध्यक्ष ॲड.जीवनराव देशमुख यांनी दिला आहे.

.....

कब्रस्तान

या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.दरम्यान, किट्टी आडगाव येथील नागरिक जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यासाठी आले असता अत्तार फाऊंडेशन महाराष्ट्रच्या वतीने त्यांच्या न्याय्य मागणीला जाहीर पाठिंबा देण्यात आला. कब्रस्तानासारख्या धार्मिक व सार्वजनिक महत्त्वाच्या जागेवरील अतिक्रमण दूर करून संबंधित समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी भूमिका फाऊंडेशनच्या वतीने मांडण्यात आली.या प्रकरणात जिल्हा प्रशासनाने त्वरित चौकशी करून संबंधित जागेची पाहणी करावी, अतिक्रमणाबाबत योग्य ती कायदेशीर कार्यवाही करावी आणि कब्रस्तानाकडे जाणारा रस्ता मोकळा करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील निर्भिड साप्ताहिक रविवार

जगभित्र

विष्णू निवृत्ती कदम
(संपादक जालना, आवृत्ती), ९४२२९९१०३२, ७३८५८९०४४४

PRGI.No.- MHMAR/25/A2848

जालना — रविवार दि.२९ नोव्हेंबर २०२६ — पान नं.३

मोबाईल टॉवरचे डी.आर.यु. कार्ड चोरणारा आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात; १५ हजारांचा मुद्देमाल जप्त, दोन गुन्हे उघड

जालना । ज्ञानेश्वर साळुंके

जालना जिल्ह्यातील मोबाईल टॉवरचे डी.आर.यु. (उठण) कार्ड चोरी करणाऱ्या चोरट्याचा स्थानिक गुन्हे शाखेच्या (डउइ) पथकाने पर्दाफाश केला आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शेकटा येथून एका आरोपीला जेरबंद करून त्याच्याकडून १५ हजार रुपये किमतीचे तीन डी.आर.यु. कार्ड जप्त करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे बदनापूर आणि अंबड पोलीस ठाण्यातील दोन गुन्हे उघडकीस आले आहेत.

जालना जिल्ह्यात मोबाईल टॉवरचे साहित्य चोरी करणाऱ्या टोळीचा शोध घेण्याचे आदेश पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांना दिले होते. त्यानुसार पथकातील अधिकारी व अंमलदार तपास करत असताना दि. २७ नोव्हेंबर रोजी गुप्त बातमीदाराकडून महत्त्वाची माहिती मिळाली. सायगाव डोंगरगाव (ता. बदनापूर) आणि शेवगा (ता. अंबड) येथील इंडस कंपनीच्या मोबाईल टॉवरचे प्रत्येकी तीन डी.आर.यु. कार्ड वसीम सलीम शेख (वय ३९, रा. शेकटा, ता. जि. छत्रपती संभाजीनगर) याने चोरल्याचे निष्पन्न झाले.

या माहितीवरून पोलिसांनी शेकटा येथे सापळा रचून आरोपी वसीम शेख याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने शेवगा (ता. अंबड) येथील टॉवरचे कार्ड चोरल्याची कबुली दिली असून त्याच्या ताब्यातून १५ हजार रुपये किमतीचे तीन डी.आर.यु. कार्ड जप्त करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे बदनापूर पोलीस ठाणे (गु.र.क्र. ५२७/२०२६, कलम ३०३(२) भा.न्या.सं.) आणि अंबड पोलीस ठाणे (गु.र.क्र. ८२३/२०२६) येथील गुन्हे उघड झाले आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, पोउपनि राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार लक्ष्मीकांत आडेप, संदीप चिंचोले, सागर बावीस्कर, दत्ता वाघुंडे, बाबा गायकवाड, शिवप्रसाद एखंडे, कैलास चेके आणि अशोक जाधवर यांनी केली आहे.

रुग्णालयांच्या इमारतींसोबतच आरोग्य सेवा अधिक दर्जेदार देण्याला प्राधान्य : प्रकाश आबिटकर

घनसावंगी येथील श्रेणीवर्धित १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचे लोकार्पण; वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्यावर भर

जालना । प्रतिनिधी

रुग्णालयांच्या सुसज्ज आणि आधुनिक इमारती उभारण्याबरोबरच तेथे मिळणाऱ्या आरोग्य सेवाही तितक्याच दर्जेदार, लोकाभिमुख आणि रुग्णांना दिलासा देणाऱ्या असणे आवश्यक आहे. रुग्णालयांच्या इमारतींपेक्षाही तेथील आरोग्य सेवा अधिक देखण्या असाव्यात. यासाठी वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सेवाभावाने काम करून सामान्य नागरिकांना उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले.

घनसावंगी येथील ३१ कोटी २५ लाख रुपये निधीतून उभारण्यात आलेल्या श्रेणीवर्धित १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या नवनिर्मित इमारतीचे लोकार्पण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांना अल्प खर्चात तसेच आवश्यकतेनुसार मोफत आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा मिळणे ही शासनाची प्राथमिकता आहे. त्यासाठी आरोग्य संस्थांच्या पायाभूत सुविधा विकसित करण्यासोबतच वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपलब्धता वाढविण्यावर शासन भर देत आहे. नवीन इमारती, आधुनिक वैद्यकीय सुविधा आणि पुरेसे मनुष्यबळ यांची सांगड घालून ग्रामीण रुग्णालये ही खऱ्या अर्थाने आरोग्य मंदिरे बनविण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे मंत्री आबिटकर यांनी स्पष्ट केले.

राज्यात आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यासाठी १ हजार ४०० वैद्यकीय अधिकारी आणि १ हजार ९०० समुदाय आरोग्य अधिकारी सेवेत दाखल करण्यात येत आहेत. तसेच आंदोलन करणाऱ्या १५ हजार कर्मचाऱ्यांना नियुक्ती आदेश देण्याची कार्यवाही सुरू आहे. या नियुक्त्यांचा प्रत्यक्ष रुग्णसेवेसाठी प्रभावी उपयोग झाला पाहिजे. नियुक्त होणाऱ्या वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी स्थानिक स्तरावर वास्तव्यास राहून नागरिकांना नियमित आरोग्य सेवा द्यावी. पुढील काळात आरोग्य सेवांचा दर्जा उंचावण्याची जबाबदारी आरोग्य यंत्रणेने स्वीकारावी, असेही त्यांनी सांगितले.

राज्यात बुलढाणा, नांदेड, पालघर आणि ठाणे यांसह विविध जिल्ह्यांमध्ये आरोग्य संस्थांच्या नवनिर्मित इमारतींचे लोकार्पण करण्यात येत आहे. त्याचबरोबर १०८ रुग्णवाहिका सेवेसाठी उपलब्ध असलेल्या १ हजार ७५० वाहनांपैकी पहिल्या टप्प्यात ३५० रुग्णवाहिकांचा संच उपलब्ध करून देण्यात येणार आहे. प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून रुग्णांना अधिक प्रभावीपणे उपचार मिळावेत, यासाठी शासन



निर्णयातही आवश्यक बदल करण्यात आले आहेत. रुग्णालयांच्या पायाभूत सुविधा, रिक्त पदांची भरती आणि आरोग्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी यांच्या माध्यमातून राज्यातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा देण्याची जबाबदारी आरोग्यमंत्री म्हणून स्वीकारत असल्याचे त्यांनी नमूद केले.

दुष्काळी परिस्थितीत नागरिकांना आरोग्य सेवांबाबत कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी आरोग्य यंत्रणेने संवेदनशीलतेने काम करावे. संकटाच्या काळात शासन नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, हा विश्वास जनतेमध्ये निर्माण करण्याची जबाबदारी प्रशासन आणि आरोग्य विभागाची असल्याचेही मंत्री आबिटकर यांनी सांगितले. यावेळी खासदार संजय जाधव यांनी जिल्हा रुग्णालयातील रुग्णवाहिका चालक आणि परिचारिकांची कमतरता तसेच विविध संवर्गांतील रिक्त पदांचा प्रश्न मांडला. आरोग्य संस्थांमधील रिक्त पदे तातडीने भरल्यास रुग्णांना वेळेवर आणि अधिक चांगल्या आरोग्य सेवा मिळण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

आमदार हिकमत उढाण यांनी दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर कार्यक्रम साधेपणाने आयोजित करण्यात आल्याचे सांगितले. ३१ कोटी २५ लाख रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक सुविधांनी युक्त रुग्णालयाचा घनसावंगी व परिसरातील नागरिकांना मोठा लाभ होणार असून, नागरिकांनी या सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त घनसावंगी येथील ४६ बालकांच्या हृदयशस्त्रक्रिया ठाणे येथे करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. महाकाळ, तीर्थपुरी आणि साष्टे पिंपळगाव येथे रुग्णालयांसाठी जागा उपलब्ध असून, तेथील रुग्णालयांच्या बांधकामासह रिक्त पदे आणि आवश्यक पायाभूत सुविधांचे प्रश्न मार्गी लावण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील यांनी प्रास्ताविकात घनसावंगी येथील आरोग्य संस्थेचा प्राथमिक आरोग्य केंद्रापासून ३० खाटांच्या रुग्णालयापर्यंत आणि आता श्रेणीवर्धित १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयापर्यंत झालेला विकासात्मक प्रवास विशद केला. यावेळी हृदयशस्त्रक्रिया यशस्वी झालेल्या आठ बालकांचे मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते भेटवस्तू देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लहू मिसाळ यांनी केले, तर मोहन गोडसे यांनी आभार मानले.

जालन्यात हृदयरोग उपचारांना लवकरच मिळणार नवी दिशा!

सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते कॅथलॅबचे भूमिपूजन

जालना । प्रतिनिधी

येथील जिल्हा सामान्य रुग्णालय परिसरामध्ये २४.४७ कोटी रुपये खर्च करून उभारण्यात येणाऱ्या अत्याधुनिक कॅथलॅबचे भूमिपूजन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते आज पार पडले. जालना जिल्ह्यात आरोग्य संवाद यात्रेनिमित्त सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री प्रकाश आबिटकर आले होते. यावेळी आमदार अर्जुन खोतकर, आरोग्य सचालक डॉ. विजय कंदेवाड, आरोग्य उपसंचालक डॉ. कांचन वानेरे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

जालना शहरात लवकरच आधुनिक व सुसज्ज अशी कॅथलॅब सुरु होणार असून, जिल्ह्यातील हृदयविकाराच्या उपचारासाठी बाहेरगावी जाण्याची गरज नाही. येथील हृदयरोगींना स्थानिक पातळीवरच महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत मोफत, सुलभ आणि गुणवत्तापूर्ण व खात्रीशीर उपचार मिळणार असल्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले. हृदयविकाराच्या उपचारात पहिला एक तास हा सुवर्णकाळ असतो. कॅथलॅबमुळे तो वेळ प्रवासात वाया जाणार नाही. त्यामुळे जिल्ह्यातील जनतेला जागतिक दर्जाची हृदय उपचार सुविधा जिल्ह्यातच मिळणार, ही जालन्यासाठी अत्यंत अभिमानाची व आनंदाची बाब असल्याचे आरोग्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

कॅथलॅब म्हणजे काय ? आणि त्याचा फायदा काय ?

कॅथलॅब ही हृदयाच्या रक्तवाहिन्यांची तपासणी व उपचार करण्यासाठीची अत्याधुनिक सुविधा आहे. यामध्ये हृदयविकाराचा झटका आल्यास तात्काळ अँजिओग्राफी तपासणी होणार आहेत. गरज पडल्यास त्याच ठिकाणी अँजिओप्लास्टी, स्टेंट बसविणे शक्य होणार आहे. २४७ आपत्कालीन हृदयरोग सेवा उपलब्ध होणार असून, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना अंतर्गत पात्र रुग्णांना मोफत तसेच सवलतीच्या दरात उपचार मिळणार आहेत. ही कॅथलॅब सुरु झाल्यानंतर ग्रामीण भागातील गरीब रुग्णांना वेळेत, कमी खर्चात, जिल्ह्यातच उपचार मिळतील. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र एस. पाटील यांनी कॅथलॅबच्या कामाची सविस्तर माहिती दिली. लवकरात लवकर काम पूर्ण करून कॅथलॅब जनतेच्या सेवेत रुजू करण्याचा मानस यावेळी व्यक्त करण्यात आला. तसेच सर्व नागरिकांच्या छातीत दुखणे, धाप लागणे, घाम येणे, डावा हात, जबडा दुखत असल्यास ही हृदयविकाराची लक्षणे दिसत असल्यास रुग्णाने तात्काळ रुग्णालयात पोहोचावे, असे त्यांनी सांगितले.

नगरसेविका दर्शना खोतकर यांच्या पाठपुराव्याला यश; जालना शहराच्या विकासासाठी १५ कोटींचा निधी मंजूर!

खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्याकडुन मागणीची दखल

जालना । प्रतिनिधी

जालना महानगरपालिका क्षेत्रातील विविध मूलभूत सोयी-सुविधांच्या विकासकामांसाठी राज्य शासनाने तब्बल १५ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली आहे. महानगरपालिकेतील सत्ताधाऱ्यांकडून विकासनिधी वाटपात दुजाभाव होत असल्यामुळे आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली नगरसेवीका दर्शना खोतकर यांनी युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर यांच्या समावेत शिवसेना नगरसेवकासह खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्यासोबत भेट घेतली होती. याची खा.श्रीकांतजी शिंदे यांनी दखल घेऊन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथराव शिंदे साहेब यांच्याकडून १५ कोटी रुपयांच्या विकासनिधीला मंजुरी मिळवून दिली आहे.

जालना महानगरपालिकेतील नगरसेवीका दर्शना खोतकर/झोल व शिवसेना नगरसेवकांनी आपापल्या प्रभागातील नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडविण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाकडे वारंवार मागण्या केल्या होत्या. मात्र, विकासनिधीचे वाटप करताना शिवसेना नगरसेवकांना विश्वासात घेतले जात नसल्याचे व त्यांनी सुचविलेल्या विकासकामांना प्राधान्य दिले जात नसल्याची तसेच त्यांच्या लेखी व तोंडी मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याची तक्रार भेटी दरम्यान खा.शिंदे यांच्या कडे केली होती. तक्रारींमध्ये आपल्याला महापालिकेत येणाऱ्या अडचणी मांडल्या. प्रभागातील नागरिकांनी निवडून दिल्यानंतर त्यांच्या अपेक्षांची पूर्तता करणे ही नगरसेवकांची जबाबदारी आहे. मात्र, आवश्यक विकासनिधी उपलब्ध होत नसल्याने नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडविताना अडचणी येत असल्याचे शिष्टमंडळाने निदर्शनास आणून दिले महानगरपालिकेतील निधी वाटपाबाबतच्या तक्रारींसह प्रभागनिहाय आवश्यक विकासकामांची माहिती त्यांच्या समोर मांडली. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी मा.उपमुख्यमंत्री शिंदे साहेब यांच्या निदर्शनास ही बाब आणुन दिली. शिंदे साहेब यांनी तातडीने दखल घेत आवश्यक विकासनिधी उपलब्ध करून देण्याबाबत पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या.

जालना महानगरपालिकेतील शिवसेना नगरसेवकांना विकासनिधी उपलब्ध करून देताना दुजाभाव केला जात असल्याचे व शिवसेना नगरसेविकानी सुचविलेल्या विकासकामांकडे तसेच नागरिकांच्या प्रश्नांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचे आपल्या निदर्शनास आले. त्यानुसार मी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्यासोबत त्यांची भेट घडवून आणली. त्यांनी नगरसेवकांच्या समस्या जाणून घेत विकासनिधी उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक भूमिका घेतली. त्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब यांच्या माध्यमातून १५ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी मिळाली आहे. कोणत्याही पक्षाचा नगरसेवक असला तरी त्याच्या प्रभागातील नागरिकांना मूलभूत सुविधा मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. राजकीय मतभेदांचा परिणाम नागरिकांच्या विकासावर होऊ नये, ही आमची भूमिका आहे.

– अभिमन्यू अर्जुनराव खोतकर, युवासेना सचिव

आमच्या अडचणी वरिष्ठ नेतृत्वाने समजून घेतल्या; नागरिकांच्या विकासकामांना मिळाला निधी!

नागरिकांनी मोठ्या विश्वासाने आम्हाला नगरसेवक म्हणून निवडून दिले आहे. त्यांच्या प्रभागातील रस्ते, नाल्या, पथदिवे आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही आमची



जबाबदारी आहे. मात्र, महानगरपालिकेतील सत्ताधारी भाजपाकडून विकासनिधी वाटपात शिवसेना नगरसेवकांना सातत्याने दुजाभावाची वागणूक मिळत असल्याचा आमचा अनुभव आहे. वारंवार मागण्या करूनही अनेक विकासकामे मार्गी लागत नसल्याने नागरिकांना उत्तर देताना आम्हाला अडचणी येत होत्या. त्यामुळे आम्ही सर्व शिवसेना नगरसेवक युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर यांच्याकडे गेलो. त्यांनी आमच्या अडचणी समजून घेत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्यासोबत भेट घडवून आणली. खासदार शिंदे यांनी आमचे म्हणणे ऐकून घेत १५ कोटी रुपयांचा विकासनिधी उपलब्ध करून देण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. आता या निधीला शासनाची मंजुरी मिळाल्याने प्रलंबित विकासकामे मार्गी लावण्यास मदत होणार आहे. याबद्दल सर्व शिवसेना नगरसेवकांच्या वतीने उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर आणि युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

विकासनिधीचे वाटप पक्षीय संख्याबळावर नव्हे, तर नागरिकांच्या गरजांवर व्हावे!

महानगरपालिकेत सत्ताधारी आणि विरोधी पक्ष असले तरी शहरातील प्रत्येक नागरिकाला समान नागरी सुविधा मिळणे आवश्यक आहे. शिवसेना नगरसेवकांनी महानगरपालिका प्रशासनाकडे अनेकदा विकासकामांच्या मागण्या मांडल्या; मात्र त्यांना अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याची आमची तक्रार होती. त्यामुळे सर्व शिवसेना नगरसेवकांनी एकत्रितपणे हा प्रश्न वरिष्ठ नेतृत्वाकडे मांडण्याचा निर्णय घेतला. आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली अभिमन्यू खोतकर यांनी पुढाकार घेऊन आमची खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्यासोबत भेट घडवून आणली. आमच्या मागण्यांची दखल घेऊन शासनाने १५ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली, ही समाधानाची बाब आहे. यापुढे महानगरपालिका प्रशासनाने सर्व नगरसेवकांना विश्वासात घेऊन प्रभागांच्या गरजेनुसार विकासनिधीचे न्याय्य व पारदर्शक वाटप करावे. मंजूर झालेली विकासकामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण व्हावीत, यासाठी आम्ही सर्व शिवसेना नगरसेवक सातत्याने पाठपुरावा करू. शहराच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल शिवसेनेच्या वरिष्ठ नेतृत्वाचे सर्व नगरसेवकांच्या वतीने आभार व्यक्त करतो.

– कमलेश खरे, शिवसेना विरोधी पक्षनेते, जालना महानगरपालिका

शब्द पाळणारे नेतृत्व लाभले हे आमचे भाग्य

आम्ही जालना शहर महानगरपालिका तील भेदभाव संदर्भात तक्रार करून शिवसेना नगरसेवकांच्या वार्डातील विकास कामाची यादी आणि आमदार अजूनरावजी खोतकर साहेब यांच्या मार्गदर्शनानुसार व अभिमन्यू खोतकर यांच्या नेतृत्वात दर्शनाताई झोल यांच्या सहकार्याने डॉक्टर श्रीकांत शिंदे साहेब यांची भेट घेऊन मंजुरीची मागणी केली होती त्यांनी शब्द दिल्याप्रमाणे आम्हाला न्याय मिळाला जवळपास उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब यांनी १५ कोटी लक्ष रुपये निधीच्या विकास कामांना मंजुरी दिली त्यामुळे शब्द पाळणारे नेते आम्हाला मिळाले हे आमचे मोठे भाग्य आहे. विकास कामांना मंजूर मिळाल्याबद्दल राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब आमदार अर्जुनराव खोतकर साहेब युवा नेतृत्व अभिमन्यू खोतकर व नगरसेवीका दर्शनाताई झोल यांचे मनःपूर्वक आभार.

दीपक राठोड, शिवसेना गटनेते मनपा जालना

टोमॅटो खरेदीच्या नावाखाली १५.४२ लाखांचा गंडा; मुख्य आरोपीला समृद्धी महामार्गावर बेड्या

जालना । ज्ञानेश्वर साळुंके

बदनापूर परिसरातील शेतकऱ्यांची टोमॅटो खरेदीच्या नावाखाली १५ लाख ४२ हजार ८८५ रुपयांची फसवणूक करणाऱ्या मुख्य आरोपी सागर चिमण काकड याला आर्थिक गुन्हे शाखेने समृद्धी महामार्गावर सापळा रचून अटक केली आहे. न्यायालयाने त्याला ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. बदनापूर हद्दीतील गेवराई बाजार फाटा येथील जगदंबे ड्रायव्हर ढाबा शेडमध्ये आरोपीने 'राधे-राधे ट्रेडिंग कंपनी' सुरू करून शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केला होता. १७ ते २८ सप्टेंबर २०२६ दरम्यान फिर्यादी प्रल्हाद बाबुराव टकले (रा. के.ळीगव्हाण, ता. बदनापूर) यांच्यासह इतर ३९ शेतकऱ्यांकडून १५ रुपये किलो दराने एकूण



१५,४२,८८५ रुपये किमतीचा टोमॅटो खरेदी करण्यात आला.

बँक बंद आहे, खात्याची अडचण आहे, उद्या-परवा एकत्र पैसे देतो असे सांगून आरोपीने संपूर्ण माल वाहनांमधून भरून नेला आणि २८ सप्टेंबर रोजी दुकान बंद करून मोबाईल स्विच ऑफ करत पलायन केले. याप्रकरणी बदनापूर पोलीस ठाण्यात २ ऑक्टोबर २०२६ रोजी गु.र.नं. ५२०/२०२६ अन्वये बीएनएस कलम ३१६(५), ३१८(४), ३(५) नुसार गुन्हा दाखल होऊन तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपवण्यात आला होता. तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी नाशिकमध्ये असल्याची माहिती मिळाल्याने पथक तिथे गेले; मात्र तो निसटल्याचे समजले. त्यानंतर तो समृद्धी महामार्गाने नागपूरकडे जात असल्याची माहिती मिळताच, जालना परिसरात महामार्गावर संशयास्पद वाहनाचा पाठलाग करत २६ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री त्याला मोठ्या शिताफीने जेरबंद करण्यात आले.

आरोपीला न्यायालयात हजर केले असता ५ दिवसांची पोलीस कोठडी मंजूर करण्यात आली आहे. त्याच्याविरुद्ध इतर पोलीस ठाण्यांतही अशाच तक्रारी असून, उर्वरित फरार आरोपींचा शोध सुरू आहे. पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी व उपअधीक्षक बाळासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई केली. यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक मिथुन घुगे, पोलीस उपनिरीक्षक शैलेश म्हस्के तसेच पोलीस अंमलदार गोकुळसिंग कायटे, समाधान तेलंग्रे, किरण चव्हाण, रविंद्र जाधव, विष्णू कोरडे, ज्ञानेश्वर खुने, श्रेयस वाघमारे, चालक गोविंद दराडे, मंगेश पोपळघट, सागर बावीस्कर व दत्ता वाघुंडे महिला पोलीस अंमलदार जया निकम यांनी पार पाडली.

जिल्हाधिकाऱ्यांना १ लाखांचा दंड; उच्च न्यायालयाचा दणका : ॲड. महेश धनावत

जालना । प्रतिनिधी

न्यायालयाच्या स्पष्ट आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या आणि स्वतःला कायद्यापेक्षा मोठे समजून मनमानी कारभार करणाऱ्या अधिकाऱ्यांना चाप लावत गुजरात उच्च न्यायालयाने एक ऐतिहासिक व कडक निर्णय दिला आहे. न्यायालयाच्या निर्देशांचे अवमान करून शेतजमिनीच्या अकृषक वापराच्या (एन.ए.) अर्जावर कोणतीही कारवाई न करता तो फेटाळणाऱ्या अहमदाबादच्या जिल्हाधिकाऱ्यांना न्यायालयाने तब्बल १ लाख रुपयांचा वैयक्तिक दंड ठोठावला असून, ही रक्कम त्यांनी महिनाभराच्या आत स्वतःच्या पगारातून जमा करण्याचे फर्मान सोडले आहे. जर संबंधित अधिकाऱ्याने ही रक्कम वेळेत जमा केली नाही, तर राज्य शासनाने ती जमा करून त्यांच्या वेतनातून ती वसूल करावी आणि ही सर्व रक्कम संबंधित अर्जदार महिलेला भरपाई म्हणून वर्ग करावी, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

या महत्त्वपूर्ण आणि धक्कादायक निर्णयावर प्रतिक्रिया देताना विधिज्ञ ड. महेश धनावत यांनी सांगितले की, प्रशासकीय अधिकाऱ्यांमध्ये वाढलेल्या नोकरशाहीच्या अेरावीला हा निर्णय म्हणजे एक मोठी चपराक आहे. न्यायालयाने दिलेल्या आदेशांचे पालन करणे हे प्रत्येक प्रशासकीय यंत्रणेचे कायदेशीर कर्तव्य असते. परंतु, अनेकदा अधिकारी न्यायालयाचे आदेश धाब्यावर बसवून नागरिकांना नाहक त्रास देतात आणि त्यांना वारंवार न्यायालयाचे उंबरठे झिजवायला लावतात. या निर्णयामुळे आता प्रशासनात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर योग्य ती जरब बसेल. विशेषतः जालन्याचे जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त आणि इतर जबाबदार महसूल अधिकाऱ्यांनी या निर्णयाचा गंभीर धडा घेऊन अधिक सतर्क राहणे अत्यंत गरजेचे आहे. सामान्य नागरिकांच्या अर्जांवर वेळेत आणि न्यायालयीन निकालांच्या चौकटीत राहून निर्णय घेतला नाही, तर भविष्यात त्यांच्यावरही अशाच प्रकारे स्वतःच्या खिशातून दंड भरण्याची वेळ येऊ शकते, असा इशाराही ड. महेश धनावत यांनी दिला आहे.

या संपूर्ण प्रकरणाची पार्श्वभूमी अशी आहे की, अर्जदार महिलेने आपल्या शेतजमिनीचा वापर अकृषक (एन.ए.) कामासाठी करण्यासाठी मुंबई महसूल संहितेच्या कलम ६५ अन्वये जिल्हाधिकाऱ्यांकडे परवानगी मागितली होती. मात्र, आवश्यक परवानग्या नसल्याचे कारण पुढे करत जिल्हाधिकाऱ्यांनी हा अर्ज फेटाळला होता. याविरोधात अर्जदाराने उच्च न्यायालयात धाव घेतली असता, उच्च न्यायालयाने २ मार्च रोजी याचिका मंजूर करत संबंधित महिलेला नवीन अर्ज दाखल करण्याचे निर्देश दिले होते. तसेच 'तुषारभाई हरजीभाई घेलाणी विरुद्ध गुजरात राज्य (२०१९)' या खटल्यातील उच्च न्यायालयाच्या महत्त्वपूर्ण तत्त्वांचा आधार घेऊन वैधानिक वेळेच्या मर्यादेत या अर्जावर योग्य तो निर्णय घ्यावा, असा स्पष्ट आदेश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आला होता.

त्यानुसार याचिकाकर्तीने ७ एप्रिल रोजी नव्याने अर्ज दाखल केला. परंतु, अहमदाबाद जिल्हाधिकाऱ्यांनी उच्च न्यायालयाच्या आदेशाला बगल देत, 'राज्य शासन या २ मार्चच्या आदेशाविरोधात लेटर पेटंट अपील (एलपीए) दाखल करण्याच्या प्रक्रियेत आहे' असे कारण दाखवून तो अर्ज पुन्हा फेटाळून लावला. यामुळे संतप्त झालेल्या अर्जदाराने पुन्हा एकदा उच्च न्यायालयात धाव घेतली. प्रत्यक्षात शासनाने आजपर्यंत कोणतेही अपील दाखल केले नव्हते, तरीही अर्जदाराला वारंवार एका दारातून दुसऱ्या दारात फेऱ्या मारायला भाग पाडले जात असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

अधिकाऱ्यांच्या या बेजबाबदार वर्तनामुळे याचिकाकर्त्या महिलेला जो त्रास सहन करावा लागला, त्याची भरपाई संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतःच्या खिशातून केली पाहिजे, असा स्पष्ट दृष्टिकोन मांडत न्यायालयाने त्यांना १ लाख रुपयांचा दंड ठोठावला. ही दंडाची रक्कम एका महिन्याच्या आत न्यायालयाच्या रजिस्ट्रीमध्ये जमा करण्याचे आणि अर्जदार महिलेची खात्री करून ही रक्कम त्यांच्या बँक खात्यात इलेक्ट्रॉनिक पद्धतीने वर्ग करण्याचे निर्देश दिले गेले आहेत. यासोबतच उच्च न्यायालयाने जिल्हाधिकाऱ्यांचा तो फेटाळणीचा आदेश रद्दबातल ठरवून याचिकाकर्तीचा अर्ज पूर्ववत बहाल केला आणि त्यावर नियमानुसार पुन्हा नव्याने कायदेशीर निर्णय घेण्याचे निर्देश देऊन याचिका मंजूर केली आहे. या महत्त्वपूर्ण निकालाची नोंद २०२६ लाइव्हलॉ (गुजरात) ३०९ अशी केली गेली असून, संपूर्ण प्रशासकीय वर्तुळात या निर्णयाची जोरदार चर्चा सुरू आहे.

पाण्याची बचत व अपव्यय रोखण्यासाठी रोटरी क्लब जनजागृती करणार

जालना । प्रतिनिधी

संभाव्य दुष्काळ आणि भीषण पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर जालना शहरातील विविध भागात जाऊन पाण्याचा काटकसरीने वापर करण्यासह पाणी बचतीसाठी प्रत्यक्ष जनजागृती करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय रोटरी क्लब ऑफ जालना रेनबो आणि शहरातील विविध सामाजिक संस्थांच्या संयुक्त बैठकीत घेण्यात आला.

रोटरी रेनबो क्लबच्यावतीने अध्यक्ष मधुलता भक्कड यांच्या पुढाकारातून दुष्काळ आणि पाणी टंचाई या विषयावर शुक्रवार दि.२७ नोव्हेंबर रोजी आयोजित संयुक्त बैठकीत वासंदर्भात निर्णय घेण्यात आला. यावेळी बोलताना ज्येष्ठ उद्योजक सुनील रायठठ्ठा म्हणाले की, जालना शहराला सन २०१० पासून पाणी टंचाईसोबत मुकाबला करावा लागतो, त्यावर मात करण्याचे आदर्श आपण निर्माण केले आहेत. महाराष्ट्रात सर्वप्रथम घाणेवाडी तलावातील गाळ काढण्याचे काम हाती घेण्यात आले आणि आज हे काम राज्यातील कानाकोपऱ्यात पोचले. पाणी हा एक नैसर्गिक रिसोर्स आहे. आपण त्याचा अत्यंत काटकसरीने वापर केला पाहिजे यासाठी सर्वांनीच प्राधान्याने काम केले पाहिजे, असे ते म्हणाले.

मनपाची पाणी पुरवठा योजना योग्य क्षमतेने काम करत नाही. याकडे जागृत नागरिकांनी लक्ष दिले पाहिजे, असे मत पत्रकार सुरेश केसापूरकर यांनी व्यक्त केले. सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी रोटरी रेनबो क्लबच्या माध्यमातून प्रयत्न केले जाणार असल्याचे सचिव डॉ. अतुल जिंतुरकर यांनी सांगितले. रोटरीचे माजी प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांनी शासन सर्वच करेल, असे गृहीत धरणे चूकीचे असल्याचे सांगत सामाजिक संघटनांनी एकत्र येण्याची गरज व्यक्त केली. शहराच्या अनेक भागात मनपाच्या पाण्याचा अपव्यय होतो, असे डॉ. बळीराम बागल म्हणाले. रोटरी रेनबो क्लबच

महाराष्ट्रातील निर्भिड साप्ताहिक रविवार

जगमित्र

संतोष सोनवणे (लातूर जिल्हा प्रतिनिधी)
मो.9673158719

PRGI.No.- MHMAR/26/A2511

लातूर जिल्हा आवृत्ती — रविवार दि.२९ नोव्हेंबर २०२६ — पान नं.४



ज्येष्ठ नागरिकांच्या दीर्घायुष्याचा गौरव; आरोग्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना 'आरोग्यरत्न' पुरस्कार प्रदान

लातूर येथे उत्कृष्ट जीवनशैली व आरोग्यरत्न सन्मान सोहळा उत्साहात संपन्न; १०५ वर्षांच्या ज्येष्ठ नागरिकांसह विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सन्मान

लातूर । संतोष सोनवणे

उत्तम आरोग्य हीच माणसाची खरी संपत्ती असून निरोगी जीवनशैली ही यशस्वी आणि आनंदी जीवनाची गुरुकिल्ली आहे. आधुनिक जीवनशैलीतील धावपळ, कामाचा ताण आणि बदलत्या आहार-विहाराच्या सवयींमुळे आरोग्याच्या समस्या वाढत आहेत. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या आरोग्याला प्राधान्य देत नियमित व्यायाम, योगासने, संतुलित आहार आणि व्यसनमुक्त जीवनशैलीचा स्वीकार करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी केले.

लातूर येथे आयोजित 'उत्कृष्ट जीवनशैली व आरोग्यरत्न सन्मान सोहळ्या'त ते बोलत होते. या सोहळ्यात वयाची १०५, १०० आणि ९४ वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांचा 'जीवन गौरव पुरस्कार' देऊन विशेष सन्मान करण्यात आला. तसेच आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या सात मान्यवरांना 'आरोग्यरत्न पुरस्कार' प्रदान करून त्यांच्या सेवाभावी कार्याचा गौरव करण्यात आला.

निरोगी जीवनशैलीचा स्वीकार करणे काळाची गरज : ना. बाबासाहेब पाटील

यावेळी बोलताना सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील म्हणाले की, आजच्या धकाधकीच्या जीवनात माणूस आर्थिक प्रगतीच्या मागे धावत असताना स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करीत आहे. मात्र, निरोगी शरीर आणि प्रसन्न मन हीच खऱ्या अर्थाने जीवनातील सर्वांत मोठी संपत्ती आहे. आजार झाल्यानंतर उपचार करण्यापेक्षा आजार होऊ नयेत यासाठी प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा, नियमित आरोग्य तपासणी आणि आरोग्यविषयक जनजागृती महत्त्वाची आहे. नियमित व्यायाम, योगासने, संतुलित आहार, पुरेशी झोप आणि व्यसनांपासून दूर राहणे या गोष्टी प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनवाव्यात. त्याचबरोबर कुटुंबातील ज्येष्ठ नागरिकांचा आदर करणे, त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे आणि त्यांना सन्मानाने जीवन जगण्यासाठी आधार देणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी असल्याचेही त्यांनी नमूद केले.

१०५ वर्षांच्या ज्येष्ठ नागरिकांचा जीवन गौरव पुरस्काराने सन्मान

या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे दीर्घायुष्य लाभलेल्या ज्येष्ठ नागरिकांचा करण्यात आलेला सन्मान. अनुभवसमृद्ध जीवनप्रवास, कुटुंब आणि समाजासाठी दिलेले योगदान तसेच त्यांच्या दीर्घायुष्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने चार ज्येष्ठ नागरिकांना 'जीवन गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला.



जीवन गौरव पुरस्काराचे मानकरी १. श्री. चतुर्भुज राघोबा पाटील – वय १०५ वर्षे, २. श्री. रामराव नारायणराव माडजे – वय १०५ वर्षे, ३. श्री. ज्ञानोबा गोविंद चामले – वय १०० वर्षे, ४. श्री. रामचंद्र संभाजी तांदळे – वय ९४ वर्षे या ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान म्हणजे त्यांच्या अनुभवाचा, जीवनसंघर्षाचा आणि जीवनमूल्यांचा गौरव असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. त्यांच्या दीर्घायुष्याचा प्रवास नव्या पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचेही उपस्थितांनी नमूद केले.

आरोग्य क्षेत्रातील सात मान्यवरांना 'आरोग्यरत्न' पुरस्कार

समाजहिताच्या दृष्टीने आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या कार्यातून इतरांनाही प्रेरणा मिळावी, या उद्देशाने सात मान्यवरांना 'आरोग्यरत्न पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. आरोग्यरत्न पुरस्काराचे मानकरी : १. सौ. रजनी वैजनाथराव महाजन, २. डॉ. निकिता दशरथ बोराडे, ३. सौ. प्रियंका जाधव, ४. सौ. रोहिणी चामले, ५. श्री. दीपक गटागट, ६. श्री. विष्णू चाकूरकर, ७. श्री. दत्तात्रय सुभाष अपसंगेकर, आरोग्य क्षेत्रातील योगदानाची दखल घेऊन प्रदान करण्यात आलेल्या या पुरस्कारांमुळे सेवाभावी कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन मिळणार असून समाजात आरोग्यविषयक सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होण्यास मदत होणार आहे.

विविध संस्थांचा सहभाग; सामाजिक संघटनांचे सहकार्य

या सोहळ्याच्या आयोजनासाठी विविध सामाजिक, पत्रकारिता आणि सेवाभावी संस्थांनी निमंत्रक म्हणून सहभाग नोंदविला. यामध्ये लायन्स क्लब ऑफ लातूर सिटी, लातूर जिल्हा साप्ताहिक पत्रकार संघ, भारतीय पत्रकार संघ, पुरुष हक्क संरक्षण समिती आणि त्र्यंबकआप्पा माळेवाडे प्रतिष्ठान, उदगीर या संस्थांचा समावेश होता. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात आली होती.

निवड समितीचे योगदान

पुरस्कारार्थींची निवड करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या निवड समितीत शशिकांत पाटील,रवीकुमार सूर्यवंशी, दत्तात्रय परळकर, संतोष सोनवणे, . लहू शिंदे, गंगाधर डिगोळे, धनराजअप्पा परसने, श्रीनिवास फडणीस, प्रफुल्लचंद्र कुलकर्णी आणि बालाजीअप्पा पिंपळे यांचा समावेश होता.

स्वागत समितीने पार पाडली महत्त्वपूर्ण जबाबदारी

कार्यक्रमाला उपस्थित राहिलेल्या मान्यवरांचे स्वागत आणि सत्काराची जबाबदारी स्वागत समितीने पार पाडली. या समितीत दिनेश गिरी,. राम रोडगे, उमेश खोसे, रवी इंगळे, हमीद शेख, राधेंद्र देबडवार, शिरीषकुमार शेरखाने, मारुती माने, प्रमोद टेकले, मनोज पटवारी, गणेश परळे आणि श्री. अशोक हनवते यांचा समावेश होता.

कार्यकारी समितीचे नियोजन आणि सहकार्य

सोहळ्याचे नियोजन, व्यवस्थापन आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी कार्यकारी समितीने विशेष परिश्रम घेतले. या समितीत जितेंद्र सराफ, अमर आळंगे, ओंकार कणकट्टे, साईनाथ क्यादरकुंटे, ज्ञानेश्वर सूर्यवंशी, सुनील ताडमाडगे, भागवत भोसले, योगानंद जोशी, विशाल मुळे, अमोल घायाळ, केशव येदले, चेतन पाटील आणि विष्णुदास कळशे यांनी जबाबदारी पार पाडली.

आयोजकांच्या पुढाकारातून आरोग्यविषयक जनजागृतीचा संदेश

*'आपले आरोग्य आपली जबाबदारी फाउंडेशन'*चे अध्यक्ष संजय राजूळे, वीरभद्र तगुडे आणि माधव तगुडे यांच्या पुढाकारातून या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास जीएसटी अधिकारी बाळासाहेब पाटील चिकटणेकर, दयानंदराव बिडवे, तुकाराम जाधव पाटील (सोनवती चेअरमन), भास्करराव सूर्यवंशी, डॉ. राजेश दरडे, निलेश राजमाने, बाबुराव पाटील, सचिन भिकाणे, शशिकांत पाटील आणि राजूभाऊ जाधव यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ नागरिक, महिला भगिनी, आरोग्य क्षेत्रातील प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ज्येष्ठांचा सन्मान आणि आरोग्यसेवकांचा गौरव हीच सोहळ्याची खरी फलश्रुती

आजच्या काळात आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे, ज्येष्ठ नागरिकांना सन्मानाचे स्थान मिळवून देणे आणि समाजासाठी आरोग्य क्षेत्रात निस्वार्थपणे कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या योगदानाची दखल घेणे अत्यंत आवश्यक आहे. याच सामाजिक जाणिवेतून आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्याने आरोग्य, सामाजिक बांधिलकी आणि ज्येष्ठांविषयी आदरभाव यांचा सुंदर संगम घडवून आणला. शतकपूर्ती केलेल्या ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान आणि आरोग्य क्षेत्रातील सात मान्यवरांना पुरस्कार प्रदान केल्यामुळे या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. 'उत्तम आरोग्य, आनंदी जीवन आणि ज्येष्ठांचा सन्मान' हा संदेश देणारा उत्कृष्ट जीवनशैली व आरोग्यरत्न सन्मान सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.विवेक सोताडेकर यांनी केले तर आभार शशिकांत पाटील यांनी केले.

किडीज इन्फो पार्क स्कूलमध्ये प्री-प्रायमरी व प्रायमरी वर्गांचा वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साहात; चिमुकल्यांसह विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग!

लातूर । संतोष सोनवणे

किडीज इन्फो पार्क स्कूलच्या प्री-प्रायमरी व प्रायमरी विभागाचा वार्षिक क्रीडा महोत्सव अत्यंत उत्साहपूर्ण, आनंददायी आणि दिमाखदार वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाभावना, आत्मविश्वास, शारीरिक तंदुरुस्ती, सांघिक भावना आणि खिलाडूवृत्ती विकसित व्हावी, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या क्रीडा महोत्सवात प्लेग्रुप ते इयत्ता दुसरीपर्यंतच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या क्रीडागुणांचे उत्कृष्ट प्रदर्शन केले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आंतरराष्ट्रीय कराटे प्रशिक्षक माननीय तुषार अवस्थी सर आणि फिटनेस व वेलनेस कोच रजनी महाजन मॅडम उपस्थित होते. तसेच शाळेच्या प्राचार्या प्रीती शहा मॅडम, उपप्राचार्या नैना पाटील मॅडम, प्री-प्रायमरी डायरेक्टर इशिका शहा मॅडम आणि शाळा समन्वयक रामेश्वर सगरे यांच्या प्रमुख उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढली. कार्यक्रमाची सुरुवात राजीव गांधी चौक ते किडीज इन्फो पार्क स्कूलपर्यंत काढण्यात आलेल्या भव्य मशाल रॅलीने झाली. या रॅलीमध्ये शाळेतील पालकांनी आपल्या पाल्यांसोबत मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांच्या हातातील मशाली, पालकांचा उत्साह आणि क्रीडामय वातावरण यामुळे संपूर्ण परिसरात चैतन्य निर्माण झाले. मुख्य कार्यक्रमस्थळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते क्रीडा मशाल प्रज्वलित करून क्रीडा महोत्सवाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले.



कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन ज्योती साबळे मॅडम व ललिता शर्मा यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन, व्यवस्थापन आणि अंमलबजावणीची महत्त्वपूर्ण जबाबदारी प्री-प्रायमरी डायरेक्टर इशिका शहा मॅडम यांनी समर्थपणे सांभाळली. त्यांच्या योग्य नियोजनामुळे आणि मार्गदर्शनामुळे हा क्रीडा महोत्सव अत्यंत शिस्तबद्ध व यशस्वीरीत्या पार पडला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे क्रीडा शिक्षक अविनाश पवार, अजित आडे, पल्लवी राठोड तसेच शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद, पालकांचा उत्स्फूर्त सहभाग आणि क्रीडांगणावर घुमणारा उत्साह यामुळे किडीज इन्फो पार्क स्कूलचा हा वार्षिक क्रीडा महोत्सव सर्वांसाठी अविस्मरणीय ठरला. खेळातून आरोग्य, स्पर्धेतून आत्मविश्वास आणि सहभागातून आनंद हा संदेश देणारा हा क्रीडा महोत्सव खऱ्या अर्थाने बालकांच्या सर्वांगीण विकासाचा आनंदोत्सव ठरला!

ग्रामपंचायत उमंबडगा खुर्द येथे विधी सेवा चिकित्सालय केंद्राचा शुभारंभ

६० दिवसांच्या विशेष मोहिमेअंतर्गत विविध शासकीय योजनांची नागरिकांना मिळणार माहिती

औसा । बी.डी. उबाळे

तालुक्यातील उमंबडगा खुर्द येथे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, लातूर, तालुका विधी सेवा समिती, औसा व राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामपंचायत उमंबडगा खुर्द येथे विधी सेवा चिकित्सालय केंद्राचा शुभारंभ तसेच ६० दिवसांच्या विशेष मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला.

यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, लातूरचे सचिव बी.एन. गिरवलकर व दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, औसा येथील न्यायाधीश एस. बी. पाटील यांनी विधी सेवा विभागाच्या १३ सेवांबाबत तसेच ६० दिवसांच्या विशेष मोहिमेच्या कार्यक्रमाची रूपरेषा उपस्थित नागरिकांना समजावून सांगितली. ग्रामीण भागातील नागरिकांना मोफत विधी सेवा, कायदेविषयक मार्गदर्शन व विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी या मोहिमेचे महत्त्व त्यांनी विशद केले. यावेळी तहसीलदार घनश्याम अडसूळ यांनी महसूल विभागाच्या विविध शासकीय योजनांची माहिती देऊन नागरिकांना मार्गदर्शन केले.



तसेच गटविकास अधिकारी आनंदकुमार मिरगणे यांनी व्ही.बी.जी. राम जी अंतर्गत जलतारा उपक्रम, पाणीटंचाई व चारा टंचाई यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. ग्रामीण भागातील पाणीटंचाई व चारा टंचाईवर मात करण्यासाठी उपलब्ध उपाययोजना आणि शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत त्यांनी माहिती दिली. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना विधी सेवा, महसूल विभाग तसेच ग्रामीण विकास विभागाच्या विविध योजनांची माहिती एकाच व्यासपीठावर मिळण्यास मदत होणार आहे. नागरिकांनी या विशेष मोहिमेचा लाभ घ्यावा असे आवाहन यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमास गट शिक्षणाधिकारी काळमाथे, विस्तार अधिकारी बालाजी तेलंग, अश्वजीत साखरे, विश्ववास कुंभकर्ण, अंगणवाडी पर्यवेक्षिका श्रीम सुचिता कटके तालुका विधी सेवा प्राधिकरणाचे सदस्य फतेपूरकर व सर्व पदाधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी लक्ष्मण मोरे, गावस्तरावरील कर्मचारी व गावातील जेष्ठ नागरिक, महिला, शेतकरी, युवक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन औसा न्यायालयाचे क लिपिक जी.एम. नागुरे यांनी केले.

लातूर प्रॉपर्टी एक्स्पोच्या सभा मंडपाचे उद्घाटन

४ ते ७ डिसेंबर दरम्यान भव्य प्रदर्शन, घर खरेदीसाठी एकाच छताखाली अनेक पर्याय

लातूर । संतोष सोनवणे

लातूर जिल्हा क्रेडाईच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'लातूर प्रॉपर्टी एक्स्पो'च्या सभा मंडपाचे उद्घाटन उत्साहात पार पडले. यावेळी क्रेडाईचे अध्यक्ष उदय पाटील, प्रोजेक्ट चेअरमन संतोष हत्ते, सचिव विष्णू मदने, कोषाध्यक्ष आशीष कामदार आणि चेअरमन जगदीश कुलकर्णी उपस्थित होते. यावेळी लातूर क्रेडाईचे माजी अध्यक्ष दीपक कोटलवार, सुबोध बेळंबे, धर्मवीर भारती, नागनाथ गित्ते, उपाध्यक्ष महेश नावंदर, श्रीकांत हिरेमठ, अमोल मुळे यांच्यासह क्रेडाईचे ओ.बी. मेंबर्स, युथ विंग, वूमेन्स विंग उपस्थित होते.

लातूर शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक परिसरात बसवेश्वर शिक्षण संस्थेच्या जागेवर दि.४ ते ७ डिसेंबर या कालावधीत 'लातूर प्रॉपर्टी एक्स्पो'चे आयोजन करण्यात आले आहे. लातूर क्रेडाईच्या वतीने दर दोन वर्षांनी या प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. यापूर्वी आयोजित करण्यात आलेल्या प्रदर्शनांना लातूरकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, एकाच छताखाली विविध गृहप्रकल्प आणि बांधकाम क्षेत्रातील पर्याय उपलब्ध करून देण्याची परंपरा क्रेडाईने कायम ठेवली आहे. यंदाचा प्रॉपर्टी एक्स्पो अधिकाधिक यशस्वी करण्यासाठी क्रेडाईच्या सर्व सदस्यांनी कंबर कसली असून, विविध समित्यांची स्थापना करून प्रत्येक सदस्यावर स्वतंत्र जबाबदारी सोपविण्यात आली आहे. सामूहिक नियोजन आणि सदस्यांच्या सहकार्याच्या माध्यमातून प्रदर्शनाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे.



या एक्स्पोच्या माध्यमातून बांधकाम व्यावसायिकांना आपले गृहप्रकल्प ग्राहकांसमोर मांडण्याची संधी मिळणार असून, ग्राहकांनाही आपल्या आवडीनुसार आणि बजेटनुसार घर निवडण्याचे अनेक पर्याय एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. विविध गृहप्रकल्पांची माहिती, उपलब्ध सुविधा, परिसर आणि घरांच्या किमती यांची प्रत्यक्ष माहिती घेण्याची संधी लातूरकरांना मिळणार आहे. त्यामुळे घर खरेदी करू इच्छिणाऱ्यांसाठी हा एक्स्पो महत्त्वपूर्ण ठरणार असून, बांधकाम व्यावसायिक आणि ग्राहक यांच्यातील संवादाचे प्रभावी व्यासपीठ म्हणूनही या प्रदर्शनाकडे पाहिले जात आहे.

माजी मंत्री आ. संजय बनसोडे 'महाराष्ट्र भूषण' पुरस्काराने सन्मानित

मुंबई येथे मोठ्या थाटामाटात संपन्न झाला सोहळा

उदगीर । पाटील मनेश

माजी मंत्री तथा उदगीर - जळकोट विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय बनसोडे यांना मुंबई येथील साईदिशा प्रतिष्ठानच्या वतीने प्रतिष्ठेचा 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार' ज्येष्ठ सिनेअभिनेते अनुपम खेर, अभिनेत्री काजल अग्रवाल, खझड अधिकारी कृष्ण प्रकाश आणि सुनील फुलारे यांच्या हस्ते देण्यात आला. उदगीर मतदार संघाचा कायापालट करुन देशाच्या नकाशावर उदगीरचे नाव कोरले. सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्राला दिलेले पाठबळ. सार्वजनिक जीवनातील त्यांचे उल्लेखनीय कार्य, शासनाच्या विविध जबाबदाऱ्या सांभाळताना जनकल्याणासाठी दिलेले योगदान तसेच समाजातील विविध घटकांच्या विकासासाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली होती.



सदर पुरस्कार आमदार संजय बनसोडे यांनी स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या पवित्र स्मृतींना आणि त्यांच्यावर विश्वास ठेवणाऱ्या उदगीर-जळकोटच्या जनतेला समर्पित केला आहे. यावेळी बोलताना आ.संजय बनसोडे यांनी दुष्काळग्रस्त शेतकरी बांधवांच्या परिस्थितीबद्दल चिंता व्यक्त करत, त्यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी अधिक जोमाने आणि वेगाने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. हा पुरस्कार म्हणजे केवळ सन्मान नसून जनसेवेची जबाबदारी अधिक निष्ठेने पार पाडण्याची प्रेरणा असल्याचे सांगितले. साईदिशा प्रतिष्ठानचे संस्थापक-अध्यक्ष दत्तात्रय बाळकृष्ण माने यांच्या माध्यमातून सन २००० पासून सामाजिक, कला, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात विविध उपक्रम राबविण्यात येतात. सामाजिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा, प्रशासकीय तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय व प्रेरणादायी कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना प्रतिष्ठानच्या वतीने पुरस्कार देऊन गौरविण्यात येत असते. काल शुक्रवार, दि. २७ नोव्हेंबर २०२६ रोजी, यशवंत नाट्य मंदिर, माटुंगा, मुंबई येथे या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. या सोहळ्यास अनेक मान्यवर उपस्थित होते. माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांना प्रतिष्ठेचा 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार' मिळाल्याबद्दल त्यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अभिनंदन केले आहे.

कुसुमताई प्राथमिक शाळेत संविधान दिन उत्साहात साजरा

संविधान दिनानिमित्त जनजागृतीसाठी शहरातून रॅलीचे आयोजन

उदगीर । पाटील मनेश

नांदेड सिडको येथील कुसुमताई प्राथमिक शाळेत आज 'भारतीय संविधान दिन' मोठ्या उत्साहात आणि विविध शैक्षणिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यावेळी झालेल्या कार्यक्रमात विचारमंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष संभाजीराव बिरादार तर प्रमुख पाहुणे मुख्याध्यापिका यु.डी. कारामुंगे, सहशिक्षक संजय सुर्यवंशी, गोविंद मुस्कावाड, एस.व्ही. चव्हाण, एम.टी. शिंदे, मुंढे मॅडम, व्ही.जी. गायकवाड, व्ही.डी. बिरादार व इतर सहशिक्षक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेचे अध्यक्ष संभाजीराव बिरादार आणि शिक्षकांच्या हस्ते भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले. यानिमित्ताने शाळेतील सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी एकत्र येऊन भारतीय संविधानाच्या उद्देशिके चे (प्रास्ताविकेचे) सामूहिक वाचन केले. सहशिक्षक एस डी आलेवाड यांनी उद्देशिकेचे वाचन केले तर संविधान गीत सहशिक्षक गोविंद मुस्कावाड यांनी सादर केले.



यावेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व, मूलभूत हक्क आणि नागरिकांची कर्तव्ये याविषयी सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. संविधानाबद्दल जनजागृती निर्माण करण्यासाठी रॅलीचे आयोजन केले होते. यात विद्यार्थी व शिक्षक यांनी सहभाग नोंदविला होता. कार्यक्रमाचे औचित्य साधून शाळेत विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस.डी. आलेवाड यांनी केले व आभार एस.जी. बिरादार यांनी मानले. यावेळी विद्यालयातील सर्वच शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

स्वामी विवेकानंद शैक्षणिक संकुलात भारतीय संविधान दिवस साजरा

उदगीर । पाटील मनेश

येथील स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ संचलित स्वामी विवेकानंद महाविद्यालय, स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ नर्सिंग व स्वामी विवेकानंद फार्मसी कॉलेज, स्वामी विवेकानंद महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने २६ नोव्हेंबर भारतीय संविधान दिवस संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.सुधीर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



यावेळी फार्मसी कॉलेज प्राचार्य डॉ.गणेश तोलसरवाड, स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.शेषनारायण जाधव, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अमर तांदळे, फार्मसी कॉलेजचे उपप्राचार्य दिग्विजय केंद्रे, पत्रकारिता विभागाचे प्रमुख प्रा.राहुल पुंडगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमात प्रा.राहुल पुंडगे यांनी आपल्या मनोगतात म्हणाले की, भारतीय संविधानातील मूल्यांची संवर्धन आणि संरक्षण करण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकांची आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तब्बल २ वर्षे ११ महिने १८ दिवस या कालावधीत अथक परिश्रम घेत भारताला जगातील सर्वात मोठे व लिखित संविधान दिले आहे. या संविधानाने आपल्याला समता, बंधुता, न्याय ही तत्वे दिली. आपले जगणे सुकर होण्यासाठी मूलभूत अधिकार दिले. आज जी आपल्या देशाची प्रगती झपाट्याने होत आहे ते या संविधानामुळे. आपल्याला या संविधानाच्या चौकटी मध्ये राहूनच जगावे लागते. हे संविधान कोणा एकाचे नसून ते या देशातील जनतेचे आहे. असे ही ते म्हणाले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

विद्यावर्धिनीत संविधान दिन उत्साहात साजरा!

उदगीर । पाटील मनेश

येथील विद्यावर्धिनी प्राथमिक व हायस्कूलमध्ये भारतीय संविधान दिन मोठ्या उत्साहात आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. भारतीय संविधानाचे महत्त्व, संविधानाने दिलेले अधिकार, कर्तव्ये तसेच लोकशाही मूल्यांची विद्यार्थ्यांना जाणीव करून देण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक राम ढगे सर होते. यावेळी व्यासपीठावर विद्यालयाचे उपमुख्याध्यापक आर. बी. वलाकटे सर, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक संदीप चीखले सर, पर्यवेक्षक संदीप बांगे सर, अविनाश पोशट्टी सर तसेच शिक्षक प्रतिनिधी बंडू पाटील सर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यानंतर संविधान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाला सुरुवात झाली.



कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या माळया मॅडम यांनी विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाची निर्मिती, त्यामागील उद्देश, संविधानातील मूलभूत हक्क व कर्तव्ये तसेच भारतीय लोकशाही व्यवस्थेत संविधानाचे असलेले अनन्यसाधारण महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. संविधान हे केवळ कायद्याचे पुस्तक नसून प्रत्येक नागरिकाला समानता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता या मूल्यांची शिकवण देणारा मार्गदर्शक दस्तऐवज आहे, याची जाणीव त्यांनी विद्यार्थ्यांना करून दिली.

अध्यक्षीय समारोप करताना विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. राम ढोसर यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांच्या जीवनात संविधानाचे महत्त्व विशद केले. संविधानाने प्रत्येक नागरिकाला दिलेले अधिकार समजून घेण्याबरोबरच आपल्या कर्तव्यांचेही प्रामाणिकपणे पालन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी लहानपणापासूनच संविधानातील मूल्ये आत्मसात करून जबाबदार, जागरूक आणि सुजाण नागरिक बनावे, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन घटक्कार सर यांनी केले. विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संविधानाच्या विचारांचा जागर आणि लोकशाही मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश देत हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

महाराष्ट्रातील निर्भिड साप्ताहिक रविवार

जगमित्र

मकसूद पटेल
जिल्हा प्रतिनिधी ९७६७७८५८५५

शेख मौला शेख उस्मान
उपसंपादक ९७६६६६४९४९

PRGI.No.- MHMAR/26/A0270

नांदेड जिल्हा आवृत्ती — रविवार दि.२९ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ५

संविधान दिन व क्रांतिवीर लहुजी साळवे जयंतीनिमित्त राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा

नांदेड । प्रतिनिधी

संविधान दिन आणि क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या जयंतीनिमित्त बहुजन शक्ती सेना महाराष्ट्र, राज्य गुणवंत कामगार असोसिएशन महाराष्ट्र आणि फकीरा विद्रोही विचारमंच महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित समाजप्रबोधनपर व्याख्यान व राष्ट्रीय-राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा शनिवार, दि. २८ शुक्रवारी हॉटेल गणराज, नमस्कार चौक, नांदेड येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी चिंतनशील अभ्यासक प्रा.केशव शेकापूरकर तर कार्यक्रमाचे उद्घघाटक उमरखेड मतदार संघाचे माजी आमदार नामदेवराव ससाणे यांच्या हस्ते करण्यात आले. सुशीलप्रकाश चिमोरे यांनी समाजप्रबोधनपर विचार मांडले. तसेच अडवोकेट प्रसाद रानवळकर, माजी सनदी अधिकारी व्ही. जे. वरवंटकर, डॉ. रामचंद्र भरांडे, मारुती वाडेकर, प्रकाश कांबळे, अनिल वाघमारे, सर्जेराव दादा पाटील ढगे, प्रमुख वक्ते डॉ.चिमुरे, नगरसेविका सौ. ललिता रवींद्र भालेराव, केशव मालेगावकर, माजी सभापती नरेंद्र कंधारे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, औद्योगिक व विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या गुणवंतांचा राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. विविध क्षेत्रातील उल्लेखनिय कार्य करणाऱ्या व विविध क्षेत्रात लढनाऱ्या हाताचा हा सन्मान व गुणगौरव आहे, ह्या शब्दात कार्यक्रमाचे आयोजक विजय रणखांब यांनी पुरस्कार प्राप्त मान्यवराप्रती आपली भावना व्यक्त केली. संविधानाचे महत्त्व, सामाजिक समता, बंधुता आणि महापुरुषांच्या विचारांचा प्रसार यावर यावेळी विचारमंथन करून संविधान ग्रंथाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमा प्रसंगी दै. साहित्य सम्राट वर्तमान पत्राचे दिवाळी विशेष अंकाचे प्रकाशन करण्यात आले यावेळी जिल्हा प्रतिनिधी नागोराव कुडके यांची उपस्तिती मध्ये मान्यवराच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कार्यक्रमाचे मुख्य आयोजक, ल.सा.क.म. चे जिल्हाध्यक्ष विजय रणखांब,नरेंद्र खंदारे, रत्नाकर शिंदे, पंडित तेलंग, गुणवंत मिसळवाड, रामदास पेंडकर, चंद्रकांत भांडवले, बाळासाहेब लोंढे, आकाश टोमके, शंकर रणखांबे, प्रशांत भिसे, दादाराव गुंडाळे, रवी रणखांब, सुनील कांबळे, बळीराम रणखांबे, बालाजी सकरगे, शिवकुमार मठवाले, प्रसिद्धी प्रमुख किशोरकुमार वागदरीकर आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला अधिकारी, कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते आणि समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन चंद्रकांत भांडवले यांनी केले.

इसापूर धरण उशाला, तरी रेडगाव-वडगावच्या शेतकऱ्यांचा घसा कोरडाच!

धरणासाठी सोन्यासारख्या जमिनी दिल्या, मात्र हक्काचे पाणी मिळेना; भाटेगाव वितरिकेच्या उजव्या कालव्याला पाणी सोडण्यास विलंब, नदी-नाले व मायनरमध्ये पाणी सोडण्याची मागणी

पाणी वितरण सुरू होऊन महिनाभर उलटला, तरी शेतकरी दररोज पाण्याची वाट पाहताहेत; अन्याय दूर न झाल्यास रस्त्यावर उतरण्याचा शेतकऱ्यांचा इशारा

अर्धापूर । संजय पंडित

इसापूर धरण कळमनुरी तालुक्याच्या सीमेवर असले, तरी या धरणाचा प्रत्यक्ष लाभ कळमनुरी तालुका आणि हिंगोली जिल्ह्यातील केवळ दहा ते वीस गावांनाच मिळत असल्याची वस्तुस्थिती आहे. दुसरीकडे, याच धरणाचे पाणी तेलंगणाच्या टोकापर्यंत पोहोचत असताना धरणाच्या परिसरातील रेडगाव, वडगाव आणि वंजारी डिग्रससह भाटेगाव वितरिकेवरील गावांतील शेतकऱ्यांना मात्र आपल्या हक्काच्या पाण्यासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. धरणासाठी आपल्या सोन्यासारख्या जमिनी दिल्यानंतरही पाण्यापासून वंचित राहावे लागत असल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

इसापूर धरणाचे पाणी आपल्या शेतापर्यंत पोहोचेल आणि दुष्काळी किंवा अडचणीच्या काळात शेतीला आधार मिळेल, या अपेक्षेने अनेक शेतकऱ्यांनी आपल्या वडिलोपार्जित जमिनी कॅनॉल, चाऱ्या आणि जलवाहिन्यांसाठी दिल्या. मात्र, प्रत्यक्षात पाणी वितरण सुरू होऊन महिनाभराचा कालावधी उलटत आला, तरी भाटेगाव वितरिकेच्या उजव्या कालव्यामार्फत या भागातील शेवटच्या टोकावरील गावांपर्यंत पाणी पोहोचलेले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची आशा आता संतापात बदलत आहे.



यंदा पावसाचे प्रमाण कमी असल्याने परिसरात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. रब्बी हंगामातील पिकांना पाण्याची गरज असतानाच पशुधनाच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे. अशा परिस्थितीत शेतकरी दररोज सकाळी, दुपारी, संध्याकाळी आणि अगदी रात्री उशिरापर्यंत कालव्याकडे डोळे लावून बसत आहेत. पाणी सुटले का, आपल्या गावापर्यंत कधी पोहोचणार, याची प्रतीक्षा करत असतानाही त्यांच्या पदरी निराशाच पडत आहे.

दरम्यान, भाटेगाव वितरिका, वंजारी डिग्रस कॉलनी आणि वडगाव मायनरवरील शेतकऱ्यांची नुकतीच बैठक झाली. या बैठकीला कार्यकारी अभियंता आनंद संभाजीराव धुळगुंडे, कॅनॉल इन्स्पेक्टर नवघरे, उद्धव करपे तसेच परिसरातील शेतकरी पदाधिकारी उपस्थित होते. वसमत तालुक्यातील भाटेगाव वितरिकेवरील शेवटची गावे पिंपराळा आणि गिरगाव येथे पाणी पोहोचल्यानंतर तीन दिवसांनी वडगाव मायनरचे गेट उघडण्यात येईल, असे नियोजन बैठकीत झाल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. मात्र, नियोजनानुसार दिलेला शब्द पूर्ण न झाल्याने शेतकऱ्यांची प्रतीक्षा कायम आहे.

केवळ शेतीसाठीच नव्हे, तर पशुधनाच्या पिण्याच्या पाण्यासाठीही तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे. दांडेगाव येथून येणारी रेडगांव नदी, डिग्रस हून लेंडी नाला तसेच जवळा पांचाळ परिसरातील रेडगाव, वडगाव, वसफळ आणि सालापूर या भागातील मायनर व नाल्यांमध्ये पाणी सोडल्यास शेतकऱ्यांसह मुक्या जनावरांना मोठा दिलासा मिळू शकतो. सध्या पाण्याअभावी पशुधनासाठी पाण्याची व्यवस्था करण्याकरिता शेतकऱ्यांना भटकंती करावी लागत आहे.

इसापूर धरणाच्या उजव्या कालव्याचे पहिले रब्बी आवर्तन १ ते २४ नोव्हेंबरदरम्यान नियोजित होते परंतु आजपर्यंत या भागात पाणीच आले नाही. धरणातील उपयुक्त पाणीसाठा २७ नोव्हेंबर रोजी ५५.९७ टक्के असल्याची नोंद आहे. धरणात पाणीसाठा उपलब्ध असताना आणि पाणी वितरण सुरू असतानाही धरणाच्या लाभक्षेत्रातील काही गावांना पाण्यासाठी प्रतीक्षा करावी लागत असेल, तर या वितरण व्यवस्थेचे नियोजन नेमके कोणासाठी, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

धरणासाठी जमिनी दिल्या, मग हक्काच्या पाण्यासाठी वणवण का?

इसापूर धरणाच्या पाण्याचा लाभ तेलंगणाच्या टोकापर्यंत पोहोचत असताना धरणाच्या परिसरातील आणि हिंगोली जिल्ह्यातील लाभक्षेत्रातील गावांवर अन्याय का, असा सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत. प्रशासनाने केवळ मुख्य कालव्याच्या पाणी वितरणाचा विचार न करता भाटेगाव वितरिकेच्या उजव्या कालव्यावरील शेवटच्या गावांनाही समान न्याय द्यावा. रेडगाव, वडगाव, सालापूर, लहान डिग्रस,वंजारी डिग्रस आणि परिसरातील शेतकऱ्यांना तातडीने पाणी उपलब्ध करून द्यावे. तसेच पिण्याच्या पाण्यासाठी नदी, नाले आणि मायनरमध्येही पाणी सोडण्याचे नियोजन करावे, अशी मागणी जोर धरत आहे.

प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने न्याय्य भूमिका घेतली नाही, तर शेतकऱ्यांवरील हा अन्याय सहन केला जाणार नाही. आपल्या हक्काच्या पाण्यासाठी शेतकरी रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यासही मागेपुढे पाहणार नाहीत, असा इशारा परिसरातील संतप्त शेतकऱ्यांमधून दिला जात आहे यापुढे जाऊन रेडगाव येथील संजय महाराज रेडगांवकर यांनी गेटवर आंदोलन करणार असल्याचे सांगितले आहे.

देगलूर महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा

देगलूर । अजीम अन्सारी

अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालय देगलूर राज्यशास्त्र विभाग व तालुका विधी सेवा समिती देगलूर यांच्या संयुक्त विद्यमाने देगलूर महाविद्यालयाच्या मुख्य सभागृहात दिनांक २६/११/२०२६ रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी देगलूर दिवाणी न्यायालयाचे न्यायाधीश आर. एल. राठोड हे होते. प्रमुख उपस्थिती म्हणून देगलूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन नामदेव खताळ हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून देगलूरचे उप विभागीय पोलीस अधिकारी पोफळघट किरण, पोलीस निरीक्षक सूर्यमोहन बोलमवाड, देगलूर नगर परिषदेच्या मुख्याधिकारी सौ. निलम कांबळे, देगलूर न्यायालयातील सरकारी वकील श्री सारोळे शिवानंद, तालुका वकील संघाचे अध्यक्ष अड. वीरेंद्र पाटील, तालुका वकील संघाचे उपाध्यक्ष अड. विजयकुमार निलमवार, उप प्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, डॉ. चमकूडे एम.एम. व राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. रत्नाकर लक्षटे हे होते.



कार्यक्रमांची सुरुवात २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले जवान व नागरिक यांना श्रद्धांजली वाहून करण्यात आली. भारतीय संविधानाचे शिल्पकार व भारतीय संविधान सभेतील मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करण्यात आले. उपस्थित सर्व प्रमुख पाहुण्यांचे महाविद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले. तदनंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मोहन खताळ यांच्या मार्गदर्शनाने भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ चमकूडे एम एम यांनी प्रास्ताविकपर विचार मांडताना उपस्थितना महाविद्यालयाची शैक्षणिक व भौतिक ओळख करून दिली. प्रमुख पाहुणे उप विभागीय पोलीस अधिकारी श्री पोफळघट किरण यांनी ड्रग्स नशा जाणीव जागृती व नशा मुक्त भारत या विषयावर उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

ड्रग्स नशा व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक आरोग्यासाठी व समाज आणि राष्ट्राच्या भवितव्यासाठी कश्यप्रकारे घातक आहे. विद्यार्थ्यांनी या नशेपासून दूर राहून आपले, कुटुंबाचे, समाजाचे व राष्ट्राचे हित जोपसावे. तसेच स्वतःच्या शैक्षणिक प्रगतीवर लक्ष द्यावे असा संदेश दिला. देगलूर नगर परिषदेच्या मुख्याधिकारी सौ. निलम कांबळे यांनी संविधान दिनांचे महत्व सांगताना संविधानमुळेच आपल्याला आपले जीवन कसे आनंदाने जगता येते. भारतीय संविधान लोकशाहीचा आत्मा आहे. संविधान हाच सर्वश्रेष्ठ कायदा आहे. संविधान हाच आपला राष्ट्रीय ग्रंथ आहे. त्यातील मानवी मूल्यांचे जतन करणे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे. त्या कर्तव्याचे पालन करत विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक प्रगतीकडे लक्ष द्यावे असा उपदेश केला.त्यानंतर देगलूर तालुका वकील संघाचे सदस्य अड.परवेज काझी यांनी आपले विचार मांडताना ड्रग्स ही नशा समाजात कश्यप्रकारे वाढत आहे. ड्रग्स बाळगने, त्याची नशा करणे, त्याची तस्करी करणे इत्यादी गुन्ह्याबाबत कायद्यात कोणती शिक्षा आहे. विद्यार्थी जीवनात ड्रग्स सारख्या घातक नशे पासून विद्यार्थ्यनि दूर राहून ड्रग्स मुक्त भारत करावा अश्या घोषणा विद्यार्थ्यांना दिल्या.

अध्यक्षीय समारोप करताना दिवाणी न्यायाधीश आर एल राठोड यांनी भारतीय संविधान सभेतील सर्व सदस्यांनी संविधान लिहिताना कोणत्या मुल्यावर भर दिला. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने संविधानाचा स्वीकार केला. म्हणून आपण संविधान दिन दरवर्षी २६ नोव्हेंबर या दिवशी साजरा करतो. यामुळे तरुण पिढीला संविधानाचे भारतीयांच्या जीवनातील महत्व समजते. संविधानमुळेच आपण मूलभूत अधिकार मिळाले. मूलभूत कर्तव्याची ओळख झाली. संविधान भारतीयांचा श्वास व प्राण आहे. संविधानामुळेच आपली लोकशाही व स्वातंत्र्य टिकून आहे. या स्वातंत्र्याचा अतिरेकी स्वरूपात वापर करून समाजातील कांही लोक तरुण पिढीला ड्रग्स सारख्या धोकादायक नशेच्या आहारी ढकलत आहेत. त्या विषयी तरुण वर्गात जागृती व्हावी व नशा मुक्त भारत निर्माण करण्याच्या शासनाच्या उपक्रमात त्यांचा सहयोग लाभावा या हेतूने आजच्या या कार्यक्रमाची आखणी करण्यात आली आहे. ती आखणी देगलूर महाविद्यालयच्या सर्व टीमने चांगल्या प्रकारे केल्याचे उदगार काढले. या कार्यक्रमाचे सूत्र संचलन राज्यशास्त्र विभागातील प्रा. डॉ. माधव चोले व आभार प्रदर्शन राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. रत्नाकर लक्षटे यांनी केले. कार्यक्रमांस महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, तालुका संघाचे सर्व वकील व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

आखाडा बाळापूर सार्वजनिक विहिरीची दुरुस्ती करून पाणी उपलब्ध करून द्या

विहीर खोल करून गाळ काढण्याची ग्रामस्थांची मागणी; ग्रामविकास अधिकाऱ्यांना निवेदन

कळमनुरी । गंगासागर पंडित

कळमनुरी तालुक्यातील आखाडा बाळापूर येथील सर्व्हे नं. ३/१ मधील सार्वजनिक विहिरीचे खोलीकरण, गाळ काढणे व दुरुस्ती करून ग्रामस्थांना पुन्हा पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. याबाबत आखाडा बाळापूर ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी शिवाजी शिंदे यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात नमूद केल्यानुसार, सदर सार्वजनिक विहीर अनेक वर्षांपासून गावातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी वापरात आहे. मात्र, सध्या हिंगोली जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने विहिरीतील पाणीपातळी कमी झाली असून पाण्याची समस्या गंभीर झाली आहे. त्यामुळे विहिरीचे खोलीकरण करून गाळ काढणे व दुरुस्ती केल्यास गावातील नागरिकांना पुन्हा पिण्याचे पाणी उपलब्ध होण्यास मदत होणार असल्याचे ग्रामस्थांनी निवेदनात म्हटले आहे.

सदर विहिरीचे काम मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान, मनरेगा तसेच १५ वा वित्त आयोग व जलजीवन मिशनच्या माध्यमातून मंजूर करून घेण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच याबाबत पुढील ग्रामसभेत ठराव घेऊन प्रस्ताव पंचायत समिती कळमनुरीकडे पाठवावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.

या निवेदनावर माजी जि.प. सदस्य भगवान खंदारे, माणिक पंडित, अक्षय पतंगे, सुभाष खाडे, अमोल खंदारे, रवी सूर्यवंशी, रोहित पंडित आणि रवी पंडित यांच्यासह ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत. गावातील पाणीटंचाई लक्षात घेता प्रशासनाने सार्वजनिक विहिरीच्या दुरुस्तीचे काम तातडीने हाती घ्यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.



कृष्णापूर येथे मध्यरात्री वृद्ध महिलेच्या घरात चोरी

खिडकीतून हात घालून दोन अज्ञात इसमांनी सोन्याचे दागिने लंपास केले

कळमनुरी । गंगासागर पंडित

कळमनुरी तालुक्यातील कृष्णापूर येथे दि. २७ नोव्हेंबर रोजी पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास घरात झोपलेल्या ६० वर्षीय महिलेच्या घरात दोन अज्ञात इसमांनी चोरी केल्याची घटना घडली. खिडकीतून हात घालून महिलेच्या उशीखाली ठेवलेले सोन्याचे दागिने चोरून नेल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

शशिकलबाई किसन धनगर (वय ६०, रा. कृष्णापूर, या घरात झोपलेल्या असताना दोन अज्ञात इसमांनी खिडकीतून हात घालून त्यांच्या उशीखाली ठेवलेले सोन्याचे दागिने चोरून नेले. या चोरीमध्ये अंदाजे २७ हजार रुपये किमतीची सोन्याची पोत, २१ हजार रुपये किमतीचे कानातील दोन सोन्याचे टॉप्स आणि २१ हजार रुपये किमतीच्या सोन्याच्या दोन वेली असा एकूण ६९ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेला.

या प्रकरणी शशिकलबाई धनगर यांच्या फिर्यादीवरून आखाडा बाळापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा पोलीस निरीक्षक शरद मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार राजेश धोंगडे तपास करीत आहेत. अज्ञात चोरट्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू आहे.

केंद्रप्रमुख जयवंतराव काळे यांचा सेवापूर्ती गौरव व जयपर्व ग्रंथाच्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन

उस्माननगर । प्रतिनिधी

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा कन्या बिलोली ता.बिलोली येथील राज्य पुरस्कार प्राप्त केंद्रप्रमुख तथा जि.वि. आ. पंचायत समिती बिलोली व अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे राज्य संघटक जयवंतराव संभाजीराव काळे हे ३९ वर्षे शासनाच्या प्रदीर्घ सेवेतून नियत वयोमानानुसार दि.३० नोव्हेंबर २०२६ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यानिमित्ताने त्यांचा सपत्नीक व सहकुटुंब सेवापुर्ती गौरव सोहळा व जयपर्व या गौरव ग्रंथाचे प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.



यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बालाजी पाटील (गटशिक्षणाधिकारी पं. स.बिलोली) हे भुषावणार आहेत. तर डॉ. गोविंद नांदेडे (पूर्व शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य) यांच्या शुभहस्ते उध्दघाटक म्हणून लाभणार आहेत. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून शिवाजीराव कपाळे (से.नि. मुख्याकार्यकारी अधिकारी जि.प. नांदेड) हे रहाणार आहेत. मार्गदर्शक म्हणून दत्तात्रय मठपती (पूर्व स. उपसंचालक लातूर) यांचे मार्गदर्शन होणार आहे. या सेवापूर्ती गौरव सत्कार समारंभ सोहळ्यास व जयपूर्व ग्रंथांच्या प्रकाशन सोहळ्यास यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती वंदना फुटाने (शिक्षणाधिकारी (प्रा.) जि.प. नांदेड), माधव सलगर (शिक्षणाधिकारी (मा.) जि.प. नांदेड), दिलीप बनसोडे (शिक्षणाधिकारी (यो.) जि.प. नांदेड), श्रीनिवास पदमवार (गटविकास अधिकारी पं.स बिलोली), किशन सोने (से.नि. शिक्षणाधिकारी यवतमाळ), देविदास बस्वंदे (प्रदेशाध्यक्ष अ.म.शि.संघ), बालाजी शिंदे (से.नि. उपशिक्षणधिकारी जि.प. परभणी), सुरेश पाटील (ग.शि. अ.पं.स. मुदखेड), मोतीराम राठोड (से.नि.ग. शि.अ. पं.सं. कंधार), अशोक पवळे (से.नि.ग.शि.अ. पं स. नायगाव), ड. विलास पानपट्टे (उच्च न्यायालय खंडपीठ छत्रपती संभाजी नगर), जिवन वडजे (शिक्षक नेते म. रा. शि.संघ), फारूख बेग (राज्य उपाध्यक्ष अ. म. शि. संघ), चंद्रकांत दामेकर (राज्यनेते अ.म. शि.संघ), दिलीप देवकांबळे (चेअरमन स.पतपेढी नांदेड), दिनकर हनमते (मा. राज्याध्यक्ष शि.म. संघ), दत्तप्रसाद पांडागळे (राज्य प्रवक्ते अ.म.रा.शि.प.), चंद्रकांत मेकाले. (राज्य प्रवक्ते अ.म. शि.संघ), बालाजी घोणशेट्टे, संभाजी स्वामी, माधव लोलमवाड, भागवत मुंडे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे तरी परिसरातील शिक्षक प्रेमीनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

चार दुभत्या जनावरांच्या मृत्यूने कुटुंबावर संकट; मुदखेड काँग्रेसकडून आर्थिक मदतीचा आधार!

मुदखेड । अतिक अहमद

मुदखेड शहरातील एका गरीब कुटुंबातील तीन म्हशी आणि एका गायीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने कुटुंबावर आर्थिक संकट कोसळले आहे. रोजमजुरीसोबतच म्हशींच्या दुधाच्या उत्पन्नावर संपूर्ण कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबून होता. मात्र, एकाच वेळी चार जनावरांचा मृत्यू झाल्याने कुटुंबाचे उपजीविकेचे साधनच हिरावले गेले असून त्यांच्यासमोर उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.



या कठीण प्रसंगी माणुसकीचे नाते जपत मुदखेड शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने संबंधित कुटुंबाला आर्थिक मदत देण्यात आली. सामाजिक बांधिलकी जपत संकटात सापडलेल्या कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा प्रयत्न काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केला. राजकारणापलीकडे जाऊन गरजू आणि संकटग्रस्तांना मदतीचा हात देणे हीच खरी सामाजिक बांधिलकी असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

यावेळी जिल्हा सहसचिव गिरीश कोत्तावार, जिल्हा सरचिटणीस गंगाधर डांगे, गटनेते प्रतिनिधी मुजीब पठाण, विश्वनाथ पवार, युवक काँग्रेस शहर उपाध्यक्ष वेदांत शेवटे, सेवादल तालुकाध्यक्ष गंगाधर मगरे पाटील, गजानन संभोड, शिवानंद देवके, विठ्ठल आचार्य, गौस भाई फुलवाले, नागेश साठे, अनिस भाई यांच्यासह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

येरगी येथे संविधान दिन साजरा

देगलूर । अजीम अन्सारी

भारतीय संविधान दिनानिमित्त आज चालुक्यकालीन ऐतिहासिक नगरी येरगी येथील ग्रामपंचायत कार्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी भारतीय संविधानाचे वाचन व महत्त्व, संविधानाने दिलेले मूलभूत अधिकार, कर्तव्ये तसेच लोकशाही मूल्यांची जाणीव प्रत्येक नागरिकाला व्हावी, या उद्देशाने ग्रामपंचायत येरगीच्या वतीने गावातील प्रतिष्ठित नागरिक व विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाच्या प्रतिमा भेट देण्यात आल्या.



यावेळी सरपंच संतोष पाटील यांनी मार्गदर्शन करताना म्हणाले की संविधान हा आपल्या लोकशाहीचा भक्कम पाया असून, समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांचे जतन करणे ही आपल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे. संविधानाचा आदर करून त्यातील विचार आपल्या आचरणात आणणे, हाच या दिनाचा खरा संदेश आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. यावेळी चेअरमन वैजनाथ कालींगवार, हणमंत सोमावार, मा. उपसरपंच यादव बरसमवार, ग्रामपंचायत सदस्य विश्वनाथ बागेवार, अशोक वाघमारे, अशोक बरसमवार, हणमंत पाटील, मुख्याध्यापक नागोराव चव्हाण, अकलवार सर, प्रभाकर कालींगवार, रमेश गटावार, शकर गटावार, माधव कलमिलवार, माधव वाघमारे, गजानन भोकसखेडे, इरवंत कालिंगवार, लिंगुराम चेंडके, दशरथ कांबळे, शिवाजी कुंचगे, मारोती वाघमारे, हणमंत म्हैत्रे, प्रभाकर वाघमारे, अंगणवाडीताई, गंगामणी दारलावार, मंजूषा शिलामकोटवार, हानमाबाई बरसमवार, प्रणिता बरसमवार, बचतगट मैनाबाई वाघमारे, पार्वती येरपुलवार, आशाताई शिवनंदा कालिंगवार, द्रौपदा भुरळे, रूक्मिणीबाई येरपुलवार, शिक्षकवृंद, विद्यार्थी गावातील प्रतिष्ठित नागरिक आदींसह उपस्थितीत होते.

मिलिंद प्राथमिक शाळेत संविधान दिन साजरा

कुंडलवाडी । प्रतिनिधी

येथील मिलिंद प्राथमिक शाळेत गुरुवार, दि.२६ नोव्हेंबर २०२६ रोजी भारतीय संविधान दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक एस.डी.गिरी सर होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळेतील ज्येष्ठ सहशिक्षक एस. जी. दरबस्तेवार व जेष्ठ सहशिक्षक एस.बी. हाळीखेडे उपस्थित होते. यावेळी जेष्ठ शिक्षक एस. बी. हाळीखेडे यांनी भारतीय संविधानाचे महत्त्व, संविधान निर्मितीचा इतिहास, नागरिकांचे मूलभूत अधिकार व कर्तव्ये तसेच संविधानातील लोकशाही, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांविषयी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.



कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संविधानाविषयी जागरूकता निर्माण होऊन लोकशाही मूल्यांची रुजवणूक होण्यास मदत होते. भारतीय संविधानातील मूल्यांचा अंगीकार करण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ.शिंदे एम.एस. यांनी केले तर उपस्थितांचे आभार एस.बी. गायकवाड यांनी मानले.

शेंबोली शाळेत संविधानाचा जागर; उद्देशिकेचे सामूहिक वाचन; प्रभातफेरीतून लोकशाही मूल्यांचा संदेश

मुदखेड । अतिक अहमद

शेंबोली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत संविधान दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये संविधानाविषयी जागरूकता निर्माण करण्यासोबतच लोकशाही मूल्यांची रुजवण करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापक चंपत मुनेश्वर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.



शिक्षक रामकृष्ण लोखंडे यांनी विद्यार्थ्यांना संविधान निर्मितीचा इतिहास, मूलभूत अधिकार, नागरिकांची कर्तव्ये आणि लोकशाही मूल्यांचे महत्त्व समजावून सांगितले. संविधानाने प्रत्येक नागरिकाला अधिकार दिले असून, त्याचबरोबर कर्तव्यांचेही प्रामाणिकपणे पालन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त करून संविधानातील मूल्यांचे पालन करण्याचा संकल्प केला.

यानंतर विद्यार्थ्यांनी मानवी साखळी तयार करून गावातून प्रभातफेरी काढली. संविधानाविषयी जनजागृती करत लोकशाही, समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेचा संदेश ग्रामस्थांपर्यंत पोहोचविण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक चंपत मुनेश्वर, शिक्षक रामकृष्ण लोखंडे, शिक्षिका मंगला महाजन, संगीता वादळे, सुनीता केंद्रे, छाया मठदेवरू, जयश्री गायकवाड, गोविंद गोरेवाड यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

Weekly 29 Nov 2026_Layout 1 11/28/2026 10:36 PM Page 2

उमरी गावाला दुष्काळमुक्त करण्यासाठी सरस्वती नदीच्या खोलीकरणाचा संकल्प!

ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक मयंक गांधी यांच्या पुढाकारातून नदी खोलीकरण व रुंदीकरणाच्या कामाचा शुभारंभ; ग्रामस्थांच्या उपस्थितीत भूमिपूजन सोहळा संपन्न

माजलगाव/प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील उमरी बु. येथे गावाला दुष्काळमुक्त करण्याच्या उद्देशाने आणि भविष्यात पाणीटंचाईवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी सरस्वती नदीच्या खोलीकरण व रुंदीकरणाच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक मयंक गांधी यांच्या पुढाकारातून हाती घेण्यात आलेल्या या महत्त्वपूर्ण जलसंधारण उपक्रमाचा भूमिपूजन सोहळा आज ग्रामस्थांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला.

ग्रामीण भागात दरवर्षी जाणवणारी पाणीटंचाई, शेतीसाठी अपुरे पाणी आणि पावसाळ्यानंतर नदीपात्र कोरडे पडण्याची समस्या लक्षात घेता उमरी गावाने जलसंधारणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. केवळ पावसाच्या पाण्यावर अवलंबून न राहता उपलब्ध पाण्याचा योग्य साठा निर्माण व्हावा, नदीपात्रात अधिकाधिक पाणी साठवता यावे आणि गावाचा पाणीप्रश्न भविष्यात सुटण्यास मदत व्हावी, या उद्देशाने सरस्वती नदीच्या खोलीकरण व रुंदीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे.

या कामाचा मुख्य उद्देश म्हणजे नदीपात्राची पाणी साठवण क्षमता वाढवणे आणि बंधाऱ्याच्या माध्यमातून पावसाचे पाणी गाव-ासाठी अडवून ठेवणे हा आहे. पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडवून त्याचा गावाच्या गरजांसाठी उपयोग व्हावा, भूजलपातळीत वाढ व्हावी आणि परिसरातील विहिरी व बोअरवेलच्या पाणीपातळीला आधार मिळावा,



अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे.

उमरी गावाला दुष्काळाच्या झळा बसू नयेत, गावातील शेतकऱ्यांना शेतीसाठी पाण्याची उपलब्धता व्हावी आणि भविष्यात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी अशा प्रकारचे जलसंधारणाचे काम महत्त्वाचे ठरणार आहे. नदीचे खोलीकरण आणि रुंदीकरण झाल्यानंतर पाणी साठवणुकीसाठी अधिक जागा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. तसेच बंधाऱ्यात पाणी साठवून ठेवण्याच्या नियोजनामुळे गावाच्या जलसुरक्षेला बळ मिळण्याची अपेक्षा आहे.

या उपक्रमामुळे गावाच्या विकासाला केवळ तात्पुरता आधार मिळणार नसून भविष्यातील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पायाभरणी होत असल्याची भावना ग्रामस्थांमध्ये दिसून आली. जलसंधारणाच्या कामात गावकऱ्यांचा सहभाग आणि सहकार्य लाभल्यास हा उपक्रम अधिक प्रभावी ठरू शकतो.

भूमिपूजन सोहळ्यावेळी कृष्णा राठोड सर, श्याम सर, उमरी गावचे सरपंच आसारामजी घायतीडक, तानाजी गिलबीले, बळीरामजी घायतीडक, उद्धव घायतीडक, कृष्णदेव गिलबीले, बारकू जिजा मुळे, डॉ. पवन घायतीडक, सुरेश इनामकर, उद्धव पौळ, दादू भैया घायतीडक, एम.डी. आप्पा घायतीडक, सुरेश हांडे यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक, शेतकरी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सरस्वती नदीच्या खोलीकरण व रुंदीकरणाच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाल्याने उमरी गावात समाधानाचे (पान २ वर)

सामाजिक क्रांतीची मशाल पेटवणारे महात्मा ज्योतिबा फुले यांना जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात अभिवादन

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

सामाजिक समता, स्त्रीशिक्षण आणि वंचितांच्या हक्कांसाठी आयुष्यभर संघर्ष करणारे थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. बी. डी. मुंडे यांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.डी. मुंडे सर उपस्थित (पान २ वर)

परमिट देऊन बियाणे मिळत नसेल तर शेतकऱ्यांनी पेरणी कशी करावी? तातडीने पुरवठा करा, अन्यथा रुमणे घेऊन रस्त्यावर उतरू!

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

रब्बी हंगामातील हरभरा पेरणीसाठी शेतकऱ्यांनी ऑनलाइन नोंदणी करून शासनाकडून परमिट मिळवले; मात्र परमिट हातात असूनही परळी शहरातील तीन दुकानांवर हरभरा बियाणे उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांसमोर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. बियाणे मिळत नसल्यामुळे पेरणी कशी करायची, असा चिंताग्रस्त सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत. आधीच दुष्काळाने होरपळलेल्या शेतकऱ्यांची खरीप हंगामात मोठी निराशा झाली. रब्बी हंगामात तरी काहीतरी उत्पन्न मिळेल, या अपेक्षेने शेतकरी तयारीला लागले असताना बियाण्यांअभावी पेरणीच खोळंबल्याचे चित्र आहे.

शासनाकडून ऑनलाइन नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करून हरभरा बियाण्याचे परमिट देण्यात आले. मात्र प्रत्यक्ष बियाणे खरेदीसाठी शेतकरी दुकानांवर गेले असता बियाणे उपलब्ध नसल्याचे सांगितले जात आहे. परळी शहरातील संबंधित तीन दुकानांवर हरभरा बियाण्यांचा साठा नसल्याने शेतकऱ्यांना रिकाम्या हाताने परतावे लागत आहे. महाबीजकडून पुरेसा बियाणे पुरवठा झालेला नसल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचे सांगितले जात आहे.

महाबीजकडून पुरवठा नसल्याने परळीतील तीन दुकानांवर बियाण्यांचा ठणठणाट;शेतकऱ्यांना तातडीने बियाणे उपलब्ध करून द्या, अन्यथा रुमणे घेऊन आंदोलन करू ॲड.जीवनराव देशमुख यांचा इशारा



एकीकडे कृषी (पान २ वर)

सोनपेठ च्या जिजामाता उद्यानाचा होणार कायापालट सुशोभीकरण व स्वच्छते वर भर

नगराध्यक्ष : परमेश्वर कदम याच्या पुढाकारणे विकासकामे प्रगतिपथावर

सोनपेठ/सुभाष सावंत

सोनपेठ शहरातील नागरिकांसाठी विरंगुळ्याचे महत्त्वाचे ठिकाण असलेल्या जिजामाता उद्यानाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी सोनपेठ नगरपरिषदेच्या वतीने विकासकामांना वेग देण्यात आला आहे. उद्यानाच्या सुशोभीकरणासह स्वच्छतेची कामे सध्या प्रगतिपथावर असून, लवकरच उद्यानाचे नवे आणि आकर्षक रूप सोनपेठ च्या नागरिकांना पाहायला मिळणार आहे.

नगराध्यक्ष परमेश्वर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच नगरपरिषदेचे मुख्याधिकारी मिनिनाथ दंडवते यांच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली उद्यानाच्या विकासाची कामे सुरू



आहेत. शहरातील नागरिकांना स्वच्छ, सुंदर आणि प्रसन्न वातावरणात कुटुंबासह वेळ घालवता यावा, लहान मुलांना खेळण्यासाठी तसेच ज्येष्ठ नागरिकांना विरंगुळ्यासाठी चांगली सुविधा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने उद्यानाच्या कायापालटाचे काम हाती घेण्यात आले आहे.

शहराच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या जिजामाता उद्यानाचे सुशोभीकरण पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना एक चांगले आणि निसर्गरम्य विरंगुळ्याचे ठिकाण उपलब्ध होणार आहे. नगरपरिषदेच्या या उपक्रमामुळे शहराच्या सौंदर्यीकरणाला चालना मिळणार असून, नागरिकांकडूनही या विकासकामांचे कौतुक होत आहे.

पर्यावरणाचे संवर्धन ही केवळ शासनाची नाही तर संपूर्ण मानवजातीची सामूहिक जबाबदारी

मुंबई पुस्तक महोत्सवाला ना.मुंडे यांची भेट; पुस्तकांच्या विविध स्टॉलची केली पाहणी

मुंबई/प्रतिनिधी

पर्यावरणाचे संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून संपूर्ण मानवजातीची सामूहिक जबाबदारी आहे. पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनातील सवयी बदलणे आवश्यक आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा असून, पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी आपण स्वतःपासून सुरुवात केली पाहिजे, असे प्रतिपादन पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी केले.

मुंबई विद्यापीठाच्या कलिना कॅम्पस मैदानात २४ नोव्हेंबर पासून सुरू असलेल्या मुंबई पुस्तक महोत्सवाला ना. पंकजाताई मुंडे यांनी भेट दिली त्यावेळी वरिष्ठ पत्रकार अभिषेक शर्मा यांनी



घेतलेल्या मुलाखतीत विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना त्या बोलत होत्या. यावेळी त्यांनी पर्यावरण संवर्धन, जलव्यवस्थापन, हवामान बदल, महिलांचा पर्यावरणविषयक धोरणांमधील सहभाग, वाचनाची आवड आणि युवकांचे भविष्य याबाबत आपले विचार मांडले. आपल्या वाचनाच्या आवडीविषयी बोलताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, व्यग्र दिनक्रम आणि सततचा प्रवास यामुळे सध्या पुस्तके वाचण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. मात्र, ऑडिओ बुक्स, माहितीपट आणि ज्ञानवर्धक पॉडकास्टच्या माध्यमातून मी नवनवीन विषयांची माहिती घेत असते. वाचन ही आपल्या हृदयाच्या जवळची गोष्ट असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी पंकजाताई मुंडे यांनी मुंबई पुस्तक महोत्सवातील विविध दालनांना भेट देऊन पुस्तकांची पाहणी केली. यावेळी त्यांच्यासोबत मुंबई पुस्तक महोत्सवाचे मुख्य आयोजक आमदार अमित साटम,मुख्य संयोजक आचार्य पवन त्रिपाठी उपस्थित होते.

सौ.भाग्यश्री साखरे-नागरगोजे यांची बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये हेड कॅशिअरपदी पदोन्नती



परळी वैजनाथ/प्रतिनिधी

सौ. भाग्यश्री साखरे-नागरगोजे यांची पदोन्नती होऊन बँक ऑफ महाराष्ट्रच्या माधवबाग, परळी वैजनाथ येथील मुख्य शाखेत हेड कॅशिअर (मुख्य रोकडपाल) म्हणून नियुक्ती झाली आहे. त्यांनी नुकताच आपल्या नवीन पदाचा कार्यभार स्वीकारला. बँकिंग क्षेत्रातील अनुभव, कामाप्रती असलेली निष्ठा आणि प्रामाणिक कार्यशैली यांच्या जोरावर त्यांनी ही पदोन्नती मिळवली आहे. त्यांच्या या यशामुळे साखरे-नागरगोजे कुटुंबीयांसह नातेवाईक, बँकेतील सहकारी, मित्रपरिवार आणि परिचितांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या पदोन्नतीबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

ममदापूर येथे शेतकऱ्यांना मका बियाण्यांचे वाटप



धारूर/अतुल शिनगारे

अंबाजोगाई तालुक्यातील ममदापूर (पाटोदा) येथील पशुवैद्यकीय चिकित्सालयात शेतकऱ्यांना मका बियाण्यांचे वाटप करण्यात आले. डॉ. कैलास भारतराव परजणे-पाटील आणि सहाय्यक गोविंद गुलाले यांच्या उपस्थितीत हा उपक्रम पार पडला. शेतकऱ्यांना शेतीसाठी प्रोत्साहन मिळावे तसेच मका पिकाच्या लागवडीला चालना मिळावी, या उद्देशाने बियाण्यांचे वितरण करण्यात आले.

यावेळी ममदापूर येथील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बियाणे वाटपाच्या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून, त्यांनी या उपक्रमाचे स्वागत केले.

कब्रस्तानावरील अतिक्रमण हटविण्याच्या मागणीला अत्तार फाऊंडेशन महाराष्ट्रचा पाठिंबा

बीड/प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील मौजे किट्टी आडगाव येथील मुस्लिम समाजाच्या कब्रस्तानाच्या जागेवर काही व्यक्तींनी अतिक्रमण करून टपऱ्या व दुकाने थाटल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या अतिक्रमणामुळे मुस्लिम समाजातील नागरिकांना अंत्यविधीसाठी कब्रस्तानात जाण्यास अडचणी निर्माण होत असून, संबंधित अतिक्रमण तात्काळ हटवून कब्रस्तानाची जागा मोकळी करून द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनानुसार, ग्रामपंचायत मालमत्ता क्रमांक १२१३ मधील कब्रस्तानाची जागा सुमारे ७५ १०० फूट असून, या जागेवर काही गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींनी



अतिक्रमण केले आहे. तसेच या ठिकाणी टपऱ्या व दुकाने थाटण्यात आली आहेत. त्यामुळे गावातील मुस्लिम समाजाच्या नागरिकांना कब्रस्तानात जाण्यासाठी रस्ताही उपलब्ध नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.यापूर्वीही संबंधित व्यक्तींना अतिक्रमण हटविण्याबाबत अनेकदा विनंती करण्यात आली; मात्र त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. प्रशासनाने (पान २ वर)

बीड जिल्ह्यातून हजारो योजना कर्मचारी दिल्लीच्या महापडावात सहभागी होणार!

चार श्रमसंहिता रद्द करण्यासह विविध मागण्यांसाठी १ ते ३ डिसेंबरदरम्यान आंदोलन

धारूर/अतुल शिनगारे



केंद्र सरकारच्या कामगारविरोधी धोरणांच्या निषेधार्थ तसेच विविध प्रलंबित मागण्यांसाठी दिल्ली येथील रामलीला मैदानावर १ ते ३ डिसेंबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या महापडावात बीड जिल्ह्यातील हजारो योजना कर्मचारी सहभागी होणार आहेत. यामध्ये शालेय पोषण आहार कामगार, आशा वर्कर्स, अंगणवाडी कर्मचारी आणि ग्रामरोजगार सेवक यांचा समावेश असल्याची माहिती सीटूचे राज्य सचिव डॉ. अशोक थोरात यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली. दिल्ली येथे संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर देशभरातील लाखो योजना कर्मचारी या महापडावात सहभागी होणार आहेत. चारही श्रमसंहिता रद्द करून पूर्वीचे २९ कामगार कायदे पुन्हा लागू करावेत, योजना कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा द्यावा आणि त्यांना किमान ४२ हजार रुपये वेतन द्यावे, अशा प्रमुख मागण्या करण्यात येणार आहेत.

याशिवाय स्पर्श प्रणाली रद्द करून पूर्वीप्रमाणे बिलांचे वाटप करावे, कर्मचाऱ्यांना सामाजिक सुरक्षा लागू करावी तसेच प्रत्येक सणाला बोनस द्यावा, अशा विविध मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे. या महापडावात बीड जिल्ह्यातील हजारो योजना कर्मचारी सहभागी होऊन केंद्र सरकारचे लक्ष आपल्या मागण्यांकडे वेधणार असल्याचे डॉ.अशोक थोरात यांनी प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे.





बीड * वर्ष ०१ ले * अंक ५६ * रविवार जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक रविवार जगमित्र कार्यालय, 'जगमित्र' बाजीप्रभू नगर नेहरू चौक (तळ) परळी वैजनाथ ४३१५१५ जि.बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (साप्ताहिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.* पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) ई-मेल-jagmitra2010@gmail.com
कार्यकारी संपादक : बिलाल शेख मो.नं.९४२२४०४७४०
PRGI.No.MHMAR/25/A3358

Beed * Year 01 * Issue 56 * Sunday Jagmitra was printed by Balasaheb Jijaram Kadbane, printer, publisher, owner and editor of Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli. Published at Weekly Sunday Jagmitra Office, 'Jagmitra' Bajiprabhu Nagar Nehru Chowk (Bottom) Parli Vaijnath 431515 Dist. Beed (Maharashtra). (Editors do not necessarily agree with the textual news of the daily.e-mail-jagmitra2010@gmail.com Executive Editor : Executive Editor: Bilal Shaikh Mo.No.9422404740
PRGI.No.MHMAR/25/A3358

parbhani 25:Layout 1 11/28/2026 10:55 PM Page 1

महाराष्ट्रातील निर्भिड साप्ताहिक रविवार

जगमित्र

परभणी जिल्हा आवृत्ती | रविवार , दि.२७ नोव्हेंबर २०२६ | पान नं.४

भीमनगर येथे भव्य महाराष्ट्रीयन कबड्डी स्पर्धेला समीर भाऊ मेघे यांची उपस्थिती; खेळाडूंना दिल्या शुभेच्छा!



हिंगणा/प्रतिनिधी

विधानसभा मतदारसंघातील भीमनगर येथे स्टुडंट स्पोर्टिंग क्लब, भीमनगर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य खुल्या एकदिवसीय महाराष्ट्रीयन कबड्डी स्पर्धेला हिंगणा विधानसभा क्षेत्राचे लोकप्रिय नेते समीर भाऊ मेघे यांनी उत्साहपूर्ण वातावरणात उपस्थिती दर्शविली. रंगतदार सामने पाहून त्यांनी खेळाडूंचे कौतुक केले. स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना समीर भाऊ मेघे यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले. यावेळी त्यांनी खेळाडूंच्या मेहनतीचे आणि क्रीडा कौशल्याचे विशेष कौतुक केले. तसेच या स्पर्धेचे उत्तम नियोजन केल्याबद्दल स्टुडंट स्पोर्टिंग क्लबचे पदाधिकारी, आयोजक आणि स्वयंसेवकांचे अभिनंदन केले. बड्डीसारखेण्यासाठी अशा स्पर्धा महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरतात. त्यामुळे युवकांनी शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रातही प्रगती करावी, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. या स्पर्धेमुळे भीमनगर परिसरात क्रीडाप्रेमी आणि युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. स्पर्धेतील सर्व सहभागी खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल क्रीडा भविष्यासाठी समीर भाऊ मेघे यांनी शुभेच्छा दिल्या.

१हजार २० बेडचे भव्य रुग्णालय उभारले; अदानी समूहासोबत व्यवस्थापनाचा करार

कोविड काळातील आठवणींना उजाळा देत आमदार समीर मेघे यांचे भावनिक आवाहन



हिंगणा/नीलम चकोले

हा केवळ दिव्यांचा आणि फराळाचा सण नसून माणसामाणसांमधील नाती अधिक घट्ट करणारा, आपुलकी आणि सामाजिक बांधिलकी जपणारा सण आहे. याच भावनेतून आयोजित करण्यात आलेला दिवाळी मिलन सोहळा उत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरणात पार पडला. या सोहळ्याच्या निमित्ताने विविध क्षेत्रांतील मान्यवर, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक एकत्र आले. मात्र या कार्यक्रमाला केवळ स्नेहमिलनाचे स्वरूप नव्हते, तर समाजातील गरजू घटकांसाठी एकत्र येऊन काम करण्याचा संदेशही या निमित्ताने देण्यात आला. या कार्यक्रमाला आमदार समीर मेघे, कुलगुरू ललितराव वाघमारे, रवींद्र मेहरे, डॉ. नीलेश अग्रवाल , डॉ.नरेश गिल यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून आतिश उमरे (माजी विरोधी पक्षनेते, जिल्हा परिषद नागपूर), सौ. संध्याताई गोतमारे (माजी जिल्हा परिषद अध्यक्ष), सौ. उज्वलाताई बोढारे (माजी सभापती, जिल्हा परिषद नागपूर), मुन्नाभाऊ जयस्वाल (नगरसेवक), अंबादासभाऊ उके (माजी जिल्हा परिषद सदस्य), राजुभाऊ हरडे (माजी जिल्हा परिषद सदस्य), सौ. लताताई गौतम (नगराध्यक्ष), श्रीमती रुपाली बूधे (उपाध्यक्ष), सौ. सुनंदा बागडे, नगराध्यक्ष ,आबा काळे (नगरसेवक), सचिन मेंडजोगे (नगरसेवक), सौ. निघोट (नगरसेविका), कुसुमताई उईके (नगरसेविका), भूमिका मंडपे (नगराध्यक्ष), प्रवेश भाबडा (उपाध्यक्ष), उमेश आंबटकर (सरपंच), सचिन कोल्हे (ग्रामपंचायत सदस्य), सौ. चंदा अजमेरे (उपाध्यक्ष), सौ. अश्विनी कान्हेरकर (नगरसेविका), दिलीपभाऊ काळपांडे पंकज गजबे, राजेंद्र लोहकरे भाजप शहर अध्यक्ष यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.१ हजार २० बेडचे रुग्णालय; अदानी समूहासोबत व्यवस्थापनाचा करारआमदार समीर मेघे यांच्या परिसरात अत्याधुनिक आणि मोठ्या क्षमतेचे रुग्णालय उभारण्याच्या संकल्पनेबाबतही यावेळी माहिती देण्यात आली. आपल्या भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, गंभीर आजारांवरील उपचारांसाठी नागरिकांना दूरवर जावे लागू नये, ही आपली इच्छा होती. त्यातून १ हजार २० बेडचे भव्य रुग्णालय उभारण्यात आले. मात्र एवढ्या मोठ्या रुग्णालयाचे व्यवस्थापन आणि संचालन कोण करणार, हा महत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला होता.

त्यावर तोडगा काढण्यासाठी अदानी समूहासोबत चर्चा करण्यात आली आणि त्यानुसार करार करण्यात आला.

या माध्यमातून परिसरातील आरोग्यसेवेला नवी दिशा देण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची माहिती पत्रकार आणि डॉक्टर यांच्या कामावर कुलगुरूंची मिश्किल टिप्पणी यावेळी कुलगुरू ललितराव वाघमारे यांनी आपल्या मनोगतात पत्रकार आणि डॉक्टर यांच्या कामातील वेगळेपण अधोरेखित करत उपस्थितांमध्ये हास्याची लहर निर्माण केली.

ते म्हणाले की, जगात २ व्यक्ती अशा आहेत ज्या खूप प्रश्न विचारतात. एक म्हणजे पत्रकार आणि दुसरे म्हणजे डॉक्टर ! डॉक्टरांकडे तपासणीसाठी गेल्यानंतर दुसऱ्या दिवशी रिपोर्ट काय येईल, हे सांगता येत नाही; त्याचप्रमाणे पत्रकाराने एखादा प्रश्न विचारल्यानंतर दुसऱ्या दिवशी बातमीत काय येईल, याचाही अंदाज बांधता येत नाही, अशी मिश्किल टिप्पणी त्यांनी केली. त्यांच्या या वक्तव्याला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. देण्यात आली.

थकीत वेतनासाठी १ लाख ८० हजारांची मागितली लाच

परभणी जिपचे सहाय्यक आयुक्त संदीप घोन्सीकर एसीबीच्या ताब्यात

शासकीय अधिकारी वर्गात खळबळ

परभणी/प्रतिनिधी

तक्रारदाराच्या पत्नीचे थकीत वेतन अदा करण्यासाठी १ लाख ८० हजार रुपयांची लाच स्वीकारताना दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयातील प्रतिनियुक्तीवरील कलाशिक्षकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहात पकडले. ही रक्कम वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी स्वीकारल्याचे त्याने सांगितल्यानंतर जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) तथा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त डॉ. संदीप घोन्सीकर यांनाही ताब्यात घेण्यात आले. या कारवाईमुळे शासकीय अधिकारी वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.या प्रकरणातील ६२ वर्षीय तक्रारदाराने १७ नोव्हेंबर रोजी एसीबीकडे तक्रार दाखल केली होती. त्यांच्या पत्नीने ३० ऑक्टोबर २०२४ रोजी स्वेच्छानिवृत्ती घेतली होती. त्यांचे एप्रिल २०२१ ते ऑक्टोबर २०२२ या कालावधीतील १२ लाख ४६ हजार ४९८ रुपयांचे थकीत वेतन मंजूर झाले होते. मात्र, ही रक्कम



अदा करण्यासाठी कार्यालयातील लिपिक शेख असलम याने ११ ऑक्टोबर रोजी थकीत वेतनाच्या १५ टक्के रकमेची मागणी केल्याचा आरोप आहे.तक्रारीच्या अनुषंगाने २० नोव्हेंबर रोजी एसीबीने मोबाईल संभाषणाद्वारे लाच मागणीची पडताळणी केली. त्यावेळी शेख असलम याने १५ टक्क्यांप्रमाणे १ लाख ८० हजार रुपयांची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर २६ नोव्हेंबर रोजी बसस्थानक परिसरातील एका हॉटेलजवळ सापळा रचण्यात आला. दुपारी तीनच्या सुमारास शेख असलम याने तक्रारदाराकडून लाचेची रक्कम स्वीकारताच पथकाने त्याला रंगेहात पकडले. चौकशीदरम्यान ही रक्कम वरिष्ठ अधिकारी डॉ. संदीप घोन्सीकर यांच्यासाठी स्वीकारल्याचे शेख असलम याने पंचांसमक्ष सांगितले. त्यानंतर एसीबीने फोनद्वारे घोन्सीकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी पैसे घरी घेऊन येण्यास सांगितल्याचे तपासात समोर आले. यावरून दोघांनाही ताब्यात घेण्यात आले. कोतवाली पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. अश्विनी जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक किशोर तरोणे, सहायक पोलीस उपनिरीक्षक निलपत्रेवार, पोलीस अंमलदार बोधनकर, नागरगोजे व घुले यांच्या पथकाने केली.

वलनी येथे राहत्या घरी लीलाधर कुंबरे यांची गळफास घेऊन आत्महत्या; परिसरात हळहळ, देव्यांशी फाउंडेशनची टीम मदतीसाठी दाखल!

कळमेश्वर/नीलम चकोले

मोहपा पोलीस स्टेशन हद्दीतील चारगाव येथील रेल्वे पटरीवर २७ नोव्हेंबर रोजी एका अनोळखी व्यक्तीचा रेल्वे अपघातात मृत्यू झाल्याची घटना समोर आली होती. मृत व्यक्तीचे वय अंदाजे ४५ वर्षे असून, अनेक प्रयत्न करूनही अद्याप त्याची ओळख पटू शकलेली नाही. घटनेची माहिती मिळताच देव्यांशी फाउंडेशनचे संस्थापक तथा सामाजिक व रुग्णसेवक मंगेश गमे यांच्या मार्गदर्शनाखाली देव्यांशी फाउंडेशनची ॲम्बुलन्स टीम तातडीने घटनास्थळी दाखल झाली होती. आवश्यक मदतकार्य केल्यानंतर मृतदेह पुढील कायदेशीर प्रक्रिया व वैद्यकीय तपासणीसाठी नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेडिकल) येथे पाठविण्यात आला होता.दरम्यान, मृत व्यक्तीची ओळख पटवण्याकरता सोशल मीडिया तसेच इतर माध्यम तसेच अनोळखी इसमे बाबत वेगवेगळ्या ठिकाणी जाहिरात तयार करून पाठवून सुद्धा नातेवाईकांचा शोध न लागल्याने मृतदेह खराब होण्याची शक्यता असल्याने २८ नोव्हेंबर रोजी डीवायएसपी सागर खर्डे व मोहपा पोलीस स्टेशनचे पोलीस



निरीक्षक राजेंद्र त्रिपाठी यांच्या मार्गदर्शनाखाली मोहपा पोलीस प्रशासन आणि देव्यांशी फाउंडेशनच्या संयुक्त पुढाकारातून कळमेश्वर येथे मृत व्यक्तीवर विधिवत अंतिम संस्कार करण्यात आले.

यावेळी पोलीस कर्मचारी मंगेश धारपुरे, गणेश डांगे, प्रदीप गायकवाड, हिमांशू वंजारी तसेच देव्यांशी फाउंडेशनचे मंगेश गमे, अनुग्रह तिडके, विकास बागडे, अजय हिवराडे, राकेश बावणे, रोशन आगरकर आणि तन्मय डोंगरे यांनी अंतिम संस्काराच्या कार्यात सहभाग घेतला.ओळख नसली तरी माणुसकीची नाळ कायम!

जगात प्रत्येक व्यक्तीची ओळख, नाती आणि आप्तस्वकीय असतात. मात्र, मृत्यूनंतरही ज्याची ओळख पटू शकली नाही, अशा अनोळखी व्यक्तीला सन्मानाने अंतिम निरोप देण्याचे कार्य मोहपा पोलीस प्रशासन आणि देव्यांशी फाउंडेशनने केले. या कार्यातून सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीचे दर्शन घडले आहे. पोलीस प्रशासनाकडून या प्रकरणातील आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून, मृत व्यक्तीची ओळख पटविण्याचे प्रयत्न करण्यात आले होते.

देव्यांशी फाउंडेशन, कळमेश्वर
सामाजिक व रुग्णसेवक मंगेश गमे
संपर्क : ८३२९०२०९१६
रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा!

वलनी येथे राहत्या घरी लीलाधर कुंबरे यांची गळफास घेऊन आत्महत्या;

कळमेश्वर/नीलम चकोले



कळमेश्वर पोलीस स्टेशन हद्दीतील वलनी येथे लीलाधर पुनाजी कुंबरे (वय ३१, रा. वलनी दिनांक २८ नोव्हेंबर रोजी) यांनी आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे.घटनेची माहिती मिळताच देव्यांशी फाउंडेशनचे सामाजिक व रुग्णसेवक मंगेश गमे यांच्यासह विकास बागडे आणि राकेश बावणे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर मृतदेह पुढील वैद्यकीय व कायदेशीर प्रक्रियेसाठी ग्रामीण रुग्णालय, कळमेश्वर येथे आणण्यात आला. या दुर्दैवी घटनेमुळे वलनी परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या प्रकरणी कळमेश्वर पोलीस निरीक्षक मनोजजी काळबांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय मल्हारी डोईफोडे, परिसरात हळहळ, देव्यांशी फाउंडेशनची टीम मदतीसाठी दाखल! पोलीस कर्मचारी मनीष सोनवणे व गिरीश मोहोड पुढील तपास करीत आहेत. रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा!

हळद प्रक्रिया उद्योग व मूल्यवर्धनाला चालना देणार- उद्योगमंत्री उदय सामंत

हिंगोली/गोपाल सातपुते

हिंगोली:- वसमत येथील हळद संशोधन केंद्राच्या माध्यमातून हळद उत्पादन, प्रक्रिया व मूल्यवर्धनाला चालना मिळणार आहे. परिसरातील तीन जिल्ह्यांमधून सुमारे २५ लाख टन हळदीचे उत्पादन होत असल्याने त्यामुळे भविष्यात १०० कोटीचा हळदीवर प्रक्रिया करणारा फार मोठा उद्योग क्लस्टरच्या रूपाने उभारण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सांगितले. मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्र वसमत येथे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी भेट



देत, महाराष्ट्रातील हळद उत्पादक शेतकऱ्यांसाठी हा महत्वकांक्षी प्रकल्प आहे. या प्रक्षेत्रावर लावण्यात आलेल्या हळदीच्या ६१ वाणाची माहिती जाणून घेतली. तसेच शेतकरी प्रशिक्षण, शास्त्रज्ञाच्या माध्यमातून करण्यात येत असलेले विविध प्रयोग, प्रक्रिया उद्योग व मूल्यवर्धित उत्पादन संदर्भात माहिती देण्यात आली. महाराष्ट्रातील हळदीला जागतिक स्तरावर मागणी वाढावी, या हेतूने मोठ्या प्रमाणावर काम हाती घेण्यात आलेले आहे. नामदार उदय सामंत साहेब यांनी या केंद्राच्या माध्यमातून हळद उत्पादक शेतकऱ्यांसह हळद उद्योगालाही चालणा देण्यासाठी भविष्यात हळद उद्योग क्लस्टर ची निर्मिती करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. यावेळी संशोधन केंद्राचे अध्यक्ष नामदार हेमंत पाटील, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, हिंगोली जिल्हा पोलीस अधीक्षक श्रेणिक लोढा, हरिद्रा संचालक मा. लक्ष्मीनारायण मुरक्या, संचालक संभाजी सिध्देवार, तालुका प्रमुख राजु चापके, अशोक चेपुरवार, श्री.प्रमोद भुसारे, शिवराज यशवंते, दत्ता पाटील पांगरीकर, विश्वनाथ महाराज पुसेगावकर, वैभव लोथे, अमोल बुद्रुक, केदार पाटील, खंडु नरवाडे तसेच हळद संशोधन केंद्राचे अधिकारी, शास्त्रज्ञ, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

साहित्यिकांनी ग्रामजागराची कास धरावी : प्रा. इंद्रजित भालेराव

चाटोरी येथे ग्रामजागर साहित्य संमेलनाचे थाटात उद्घाटन; मान्यवरांची उपस्थिती

परभणी/प्रतिनिधी

ग्रामजागराची परंपरा अत्यंत जुनी असून महात्मा जोतिराव फुले, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी आपल्या विचारांतून आणि आचरणातून ग्रामजागराची संकल्पना समाजासमोर मांडली. या महापुरुषांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून वर्तमानातील साहित्यिकांनी गावखेड्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आपल्या साहित्यातून ग्रामजागराची मांडणी करावी, असे प्रतिपादन ग्रामजागर साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. इंद्रजित भालेराव यांनी केले. मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई आणि अरुणोदय बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, चाटोरी यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. २८) चाटोरी येथे आयोजित ग्रामजागर साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी स्वागताध्यक्ष कृषीभूषण कांतराव देशमुख, संमेलनाचे उद्घाटक प्राचार्य डॉ. दिनानाथ फुलवाडकर, आमदार डॉ.



राहुल पाटील, आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे, मुद्रांक जिल्हाधिकारी महेश वडदकर, रेखाताई गुट्टे, डॉ. राजेश गायकवाड, प्रा. सुभाष ढगे, डॉ. शिवाजी शिंदे, नरहरी ढगे, विजय ढाकणे, माणिक पुरी, माधव गव्हाणे, एकनाथ साळवे, भाऊसाहेब भोसले, गोविंद तुरनर, आयोजक प्रा. संदीप किरडे, सचिन जोशी, सुभाष ढगे आदींची उपस्थिती होती. प्रा. भालेराव यांनी ग्रामीण भागातील पारंपरिक जागराचे महत्त्व विशद करताना साहित्याच्या माध्यमातून होणारा नवजागर गावांच्या विकासासाठी महत्त्वाचा असल्याचे सांगितले. वारकरी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचा पाया संत नामदेवांनी रचला, तर संत जनाबाईंनी सर्व संतांप्रती विलक्षण प्रेम व्यक्त केले. महात्मा फुले आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचेही ग्रामजागरातील योगदान महत्त्वपूर्ण आहे, असे त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी हिंदी साहित्यिक राहुल सांकृत्यायन आणि बापू अडकीने यांच्या ग्रामजागरविषयक पुस्तकांचाही उल्लेख केला. महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यात वैचारिक मतभेद असले तरी ग्रामजागराच्या दृष्टीने दोघांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.उद्घाटनपर भाषणात प्राचार्य डॉ. दिनानाथ फुलवाडकर यांनी साहित्यनिर्मितीशिवाय समाजाचा विकास शक्य नसल्याचे सांगितले. साहित्यिकांनी समाजातील प्रश्नांचे डोळसपणे चिंतन करून ते आपल्या लेखनातून मांडावेत, असे आवाहन त्यांनी केले.या संमेलनात प्रा. सुभाष ढगे आणि डॉ. श्रेया रसाळ-बोबडे संपादित 'ग्रामजागर' स्मरणिका, डॉ. फुलवाडकर लिखित 'आजीची आमराई' हा काव्यसंग्रह तसेच वेदांत ढगे यांच्या 'शब्दांच्या पाऊलखुणा' या पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.संमेलनाच्या प्रारंभी ह.भ.प. अच्युत महाराज दस्तापुरकर, ह.भ.प. मुंजाभाऊ लोहरेकर आणि रेखाताई गुट्टे यांच्या हस्ते ग्रंथदिंडीचे उद्घाटन झाले. मुद्रांक जिल्हाधिकारी महेश वडदकर यांच्या हस्ते ग्रंथप्रदर्शन आणि पक्षी छायाचित्र दालनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी डॉ. शिवाजी शिंदे आणि शिक्षक माधव गव्हाणे यांचा मानपत्र, स्मृतिचिन्ह व शाल देऊन गौरव करण्यात आला.आमदार डॉ. राहुल पाटील, कांतराव देशमुख, डॉ. शिवाजी शिंदे आणि रेखाताई गुट्टे यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जयंत बोबडे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. सुभाष ढगे यांनी, तर आभार प्राचार्य डी. बी. पवार यांनी मानले. संमेलनाला साहित्यप्रेमींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

कळमेश्वर एमआयडीसी रोडवरील रेल्वे पटरीवर महिलेचा मृतदेह आढळला;

मृत महिलेची ओळख अद्याप पटलेली नाही, देव्यांशी फाउंडेशनची टीम घटनास्थळी दाखल

कळमेश्वर/नीलम चकोले

कळमेश्वर पोलीस स्टेशन हद्दीतील कळमेश्वर एमआयडीसी रोडवरील रेल्वे गेटजवळ रेल्वे पटरीवर एका महिलेचा मृतदेह आढळून आल्याची माहिती दिनांक २७ नोव्हेंबर रोजी रात्री सुमारे १०:३० वाजताच्या दरम्यान प्राप्त झाली. घटनेची माहिती मिळताच देव्यांशी फाउंडेशन सामाजिक व रुग्णसेवक टीम तातडीने मदतीसाठी



घटनास्थळी दाखल झाली. सदर मृत महिलेची ओळख अद्याप पटलेली नसून, घटनेबाबत पुढील माहिती घेण्याचे काम सुरू आहे. घटनास्थळी कळमेश्वर पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी व कर्मचारी दाखल होऊन पुढील कायदेशीर प्रक्रिया करीत आहेत. मृत महिलेची ओळख पटविण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे. संबंधित महिलेला ओळखणाऱ्या किंवा तिच्या कुटुंबीयांबाबत माहिती असणाऱ्या नागरिकांनी कळमेश्वर पोलिसांशी संपर्क साधावा. देव्यांशी फाउंडेशन सामाजिक व रुग्णसेवा रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा!

जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, तनिश ऑर्चिड, फेज-२, आर-विंग, ११०५, आळंदी रोड, चरोली फाटा, ता.हवेली, जि.पुणे, महाराष्ट्र ४१२१०५ येथे प्रकाशित केले. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही. * पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) इमेल:-jagmitra2010@gmail.com

Jagmitra, this newspaper, is printed, published, owned, and edited by Balasaheb Jijaram Kadbane at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vai., Taluka Parli Vai., District Beed (Maharashtra) and published from the Daily Jagmitra office, Tanish Orchid, Phase 2, R-Wing, 1105, Alandi Rd, Charoli Phata, Ta. Haveli, Dist. Pune, Maharashtra 412105. (The editor may not necessarily agree with the content and news in the daily newspaper. *According to the PRB Act, the responsibility for selecting the content rests with them.) Email:-jagmitra2010@gmail.com

महाराष्ट्रातील निर्भिड साप्ताहिक रविवार

जगभित्र

बद्रीनारायण घुगे (पुणे जिल्हा प्रतिनिधी)
मो.9922476927 PRGI.No.- MHMAR/26/A4099

पुणे जिल्हा आवृत्ती — रविवार दि.२९ नोव्हेंबर २०२६ — पान नं. २

पिंपरी-चिंचवडच्या डीपी प्लॅनवर ५६ हजार ७७९ हरकती; सुनावणी अंतिम टप्प्यात

पिंपरी । प्रतिनिधी

महापालिकेकडून सुधारित प्रारुप विकास योजना आराखडा १५ मे २०२५ ला प्रसिद्ध करण्यात आला होता. त्यावर १४ जुलै २०२५ पर्यंत हरकती व सूचना स्वीकारण्यात आल्या. आराखड्यावर तब्बल ५६ हजार ७७९ जणांनी हरकती नोंदवल्या आहेत. या हरकतींवर आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात तीन ऑगस्टपासून सुनावणी घेण्यास सुरुवात केली. सात सदस्यीय समितीच्या माध्यमातून हरकतींवर सुनावणी सुरु आहे. एकाच विषयाबाबत, काही आरक्षणांवर गठ्ठेच्या गठ्ठे हरकती आहेत.

हरकतदाराचे संपूर्ण म्हणणे ऐकून घेतले जात आहे. पिंपळे गुरव परिसराची सुनावणी शनिवारी (दि.२८) घेण्यात येणार आहे. त्यासाठी २४३ हरकती आहेत. तर, दापोडी भागाची सुनावणी सोमवारी (दि.३०) आहे. त्या भागाच्या एकूण ४९९ हरकती आहे. त्याच दिवशी मामुर्डी व रावेत भागाची सुनावणी घेऊन संपूर्ण हरकतींवरील सुनावणी सोमवारी (दि.३०) पूर्ण करण्याचे नियोजन आहे, असे नगररचना विभागाने सांगितले. नोटीस मिळाल्यानंतर काही नागरिक सुनावणीला गैरहजर होते. अशा नागरिकांना संपूर्ण सुनावणी झाल्यानंतर पुन्हा संधी दिली जाणार आहे. शेवटच्या टप्प्यात शासकीय यंत्रणांनी घेतलेल्या हरकतींवर सुनावणी घेतली जाणार आहे.

सुनावणी १५ डिसेंबरपर्यंत पूर्ण करून शासनाकडे पाठवणार

आराखड्यावर कार्यवाही पूर्ण करण्याची बारा महिन्यांची मुदत १४ मे २०२६ पर्यंतच होती. मात्र, महापालिका निवडणूक आचारसंहितेमुळे एक महिना आराखड्याची प्रक्रिया रखडली होती. आचारसंहितेचा कालावधी वगळल्याने मुदत १६ जून २०२६ रोजी संपली. त्यामुळे आराखड्यावरील प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ घेण्यात आली आहे. आता १५ डिसेंबर २०२६ पर्यंत सुनावणी पूर्ण करून अंतिम मान्यतेसाठी राज्य शासनाकडे पाठविण्यात येणार आहे. सुधारित प्रारूप विकास आराखड्यावर आलेल्या सर्वच हरकतींवर सुनावणी पूर्ण होत आली आहे. संपूर्ण हरकतींवरील सुनावणी पूर्ण झाल्यानंतर समिती योग्य तो बदल करुन आराखडा पुण्यातील नगररचना विभागाकडे पाठवेल. त्यानंतर अंतिम मान्यतेसाठी आराखडा राज्य शासनाकडे पाठविण्यात येईल, असे महापालिकेच्या नगररचना विभागाचे उपसंचालक ललित खोब्रागडे यांनी सांगितले.

मुलांना आहे तसे स्वीकारा; त्यांच्यावर अपेक्षांचे ओझे लादू नका

यजुर्वेंद्र महाजन यांचे सुजाण पालकत्वावर मार्गदर्शन, दीपस्तंभ फाऊंडेशनला ५१ हजारांची देणगी

पुणे । प्रतिनिधी

मुलांना आहे तसे स्वीकारून त्यांच्यावर नि:स्वार्थी प्रेम करा. त्यांच्यातील गुण ओळखून त्यांना चांगला माणूस म्हणून घडवा. मुलांना मार्कांच्या पारड्यात तोलू नका, तर त्यांच्या भावनिक आणि मानसिक विकासाला प्राधान्य द्या, असा मोलाचा संदेश प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ यजुर्वेंद्र महाजन यांनी दिला. श्रीक्षेत्र देहू येथील सृजन फाऊंडेशन संचालित अभंग इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये आयोजित 'सृजनदीप व्याख्यानमाले'च्या पहिल्या पुष्पात ते 'सुजाण पालकत्व' या विषयावर बोलत होते.

मुलांकडून अपेक्षा ठेवणे चुकीचे नाही; मात्र त्या वाजवी असाव्यात. मुलांवर अभ्यासाचे दडपण न टाकता त्यांना अभ्यासासाठी आणि चांगले गुण मिळवण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करून द्यावे. त्यांच्यातील गुण ओळखून त्यांचे कौतुक करावे. मुलांचा सर्वप्रथम भावनिक आणि मानसिक विकास झाला, तर ती आपोआप अभ्यास आणि करिअरकडे वळतात, असे महाजन यांनी सांगितले. आज पालकांना आपली मुले मोठी, श्रीमंत आणि यशस्वी व्हावीत असे वाटते; परंतु त्यापेक्षाही त्यांनी एक चांगला माणूस व्हावे आणि माणुसकी जपावी, हे अधिक महत्त्वाचे आहे. आपण आई-वडील का झालो आहोत, याचा विचार प्रत्येक पालकाने केला पाहिजे. आपल्या पणजोबांची नावेही आपल्याला आठवत नाहीत; मात्र शिक्षणासाठी आयुष्य वेचणारे महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई



फुले आजही समाजाच्या स्मरणात आहेत. माणसाच्या कार्याचे आणि विचारांचे महत्त्व यातून स्पष्ट होते. मुलांना त्यांच्या आवडीचे क्षेत्र निवडू द्या; मात्र जे कराल ते सर्वोच्च दर्जाचे करा, असा प्रेरणादायी विचारही त्यांनी मांडला. 'दीपस्तंभ'मधील मुलांच्या प्रेरणादायी जीवनकथा सांगत महाजन यांनी पालक आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधला. अत्यंत साध्या, सरळ आणि सहज शैलीत त्यांनी सुजाण पालकत्वाचे महत्त्व विशद केले.

सामाजिक बांधिलकी जोपासत दीपस्तंभ फाऊंडेशनला रुपये ५१ हजारांची देणगी अभंग इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये दरवर्षी दिवाळी मेळ्याचे आयोजन केले जाते. या मेळ्यातून मिळणारा नफा सामाजिक कार्यासाठी एका संस्थेला देणगी स्वरूपात दिला जातो. यावर्षी दिवाळी मेळ्याचे आयोजन करण्यात आले नव्हते परंतू सामाजिक कृतज्ञता आणि दातृत्वाची भावना जपत सृजन फाऊंडेशनच्या वतीने दीपस्तंभ फाऊंडेशनला रुपये ५१ हजार रुपयांचा धनादेश देणगी स्वरूपात प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्नेहालय संस्थेचे विश्वस्त किरीटी मोरे होते. यावेळी पिंपरी-चिंचवड शिक्षण मंडळाचे माजी सभापती प्राचार्य नाना शिवले, वाचनवेड संस्थेचे प्रमुख मयूरसेठ, वृक्षदाई प्रतिष्ठानचे अध्यक्ष हभप शिवाजीमहाराज मोरे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच सृजन फाऊंडेशनचे अध्यक्ष सुनील कंद, उपाध्यक्ष अशोक कंद, शाळेच्या प्राचार्या डॉ.कविता अय्यर, उपप्राचार्या शैलजा स्वामी, शिक्षकवृंद आणि बहुसंख्येने पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सृजन फाऊंडेशनचे सचिव प्रा.विकास कंद यांनी केले. सहशिक्षिका सौ.तृप्ती हांडे यांनी ओघवत्या शैलीत महाजन सरांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.वृषाली आढाव यांनी केले, तर सौ.वंदना मारणे यांनी आभार मानले.

एस एस पी शिक्षण संस्थेचे चिखलीतील जी. एस. पाटील लॉ कॉलेजमध्ये संविधान दिन उत्साहात साजरा; संविधानाच्या ऐतिहासिक प्रवासावर मान्यवरांचे मार्गदर्शन

पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी

भारतीय संविधान हा केवळ कायद्यांचा संग्रह नसून तो आपल्या देशाचा 'अमृतकुंभ' आणि प्रत्येक नागरिकाचा धर्मग्रंथ आहे. काळाच्या ओघात परिस्थितीनुसार बदल स्वीकारण्याची क्षमता असलेला हा एक 'जिवंत दस्तऐवज' आणि जीवनाचे वाहन आहे. समाजातील शेवटच्या घटकाला न्याय मिळवून देणे आणि मूलभूत हक्क व कर्तव्यांचे रक्षण ही प्रत्येक कायदे व्यावसायिकाची नैतिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे ज्येष्ठ विधिज्ञ तथा बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाचे माजी अध्यक्ष मा. ड. (डॉ.) सुधाकर एकनाथराव आव्हाड यांनी केले.

भारतीय संविधानाचे महत्त्व, लोकशाही मूल्ये आणि कायद्याचे राज्य याविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने एस. एस. पी. शिक्षण संस्थेचे जी. एस. पाटील लॉ कॉलेज (चिखली) आणि एस. एस. पाटील लॉ कॉलेज (दापोडी) यांच्या संयुक्त विद्यमाने आज शनिवार, दि. २८ नोव्हेंबर २०२६ रोजी 'संविधान दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. चिखली येथील महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये पार पडलेल्या या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे व मुख्य वक्ते म्हणून संवैधानिक मूल्ये, लोकशाही तत्त्वे आणि कायद्याचे राज्य टिकवून ठेवण्यात कायदे व्यावसायिकांची भूमिका या विषयावर ते मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी



संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. एस. बी. पाटील हे होते.

संविधान निर्मितीचा इतिहास आणि जडणघडण

संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद, मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि घटना समितीचे घटनात्मक सल्लागार सर बेनेगल नरसिंग (बी. एन.) राव यांच्या असामान्य योगदानाचा गौरव करत ड. आव्हाड यांनी संविधान निर्मितीचा रंजक प्रवास उलगडला. ते म्हणाले की, २९९ सदस्यांच्या घटना समितीने अमेरिका, जर्मनी, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि जपान यांसारख्या देशांच्या राज्यघटनांचा सखोल अभ्यास करून भारतासाठी सर्वोत्तम व धर्मनिरपेक्ष तरतुदी स्वीकारल्या. त्यामुळे भारतीय राज्यघटना ही 'उधार घेतलेली' किंवा 'चोरीची' असल्याचा आरोप पूर्णपणे खोटा व निराधार आहे.

महत्त्वाच्या कलमांचे विश्लेषण व न्यायव्यवस्था :

राज्यघटनेच्या भाग ३ मधील कलम १२ ते ३५ मधील मूलभूत हक्कांवर घटना समितीत तब्बल १६ दिवस सखोल चर्चा झाली. अमेरिकेच्या राज्यघटनेतून मूलभूत हक्कांची प्रेरणा घेतली असली, तरी सर्वात कमी शब्द असलेल्या 'कलम २१' मध्ये (जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्याचा हक्क) अमेरिकन पद्धतीऐवजी जपानच्या राज्यघटनेतून 'कायद्याने प्रस्थापित केलेली पद्धत' हा विचार स्वीकारण्यात आला.

भविष्यात देशात हुकूमशाही प्रवृत्ती किंवा हिटलरसारखा राज्यकर्ता निर्माण झाल्यास लोकशाही धोक्यात येऊ नये व संविधानाने स्वतःचे संरक्षण स्वतः करावे, यासाठी आणीबाणीच्या तरतुदी केल्या गेल्या. तसेच कलम ३६८ नुसार परिस्थितीनुसार घटनेत बदल करण्याची सोय ठेवून भारतीय राज्यघटना चिरायू केली आहे. २६ जानेवारी १९५० रोजी अस्तित्वात आलेल्या आणि २८ जानेवारी १९५० रोजी उद्घाटित झालेल्या भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे पहिले सरन्यायाधीश एच. जे. कानिया यांचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, न्यायव्यवस्थेची निष्पक्षता टिकून राहण्यासाठी निवृत्तीनंतर न्यायाधीशांनी इतर कोणत्याही पदावर जाऊ नये, हा विचार अत्यंत महत्त्वाचा आहे.

मूळ संविधानाची कलात्मकता आणि जतन

मूळ झेरॉक्स राज्यघटनेचे सुलेखन प्रेम बिहारी नारायण रायजादा यांनी कोणताही मोबदला न घेता केले असून प्रत्येक पानावर त्यांचे नाव कोरलेले आहे, तर वसंत कृष्ण वैद्य यांनी हिंदी प्रतीचे सुलेखन केले. प्रस्तावना (उद्देशिका) हा संविधानाचा आत्मा असून, नंदलाल बोस व त्यांच्या सहकाऱ्यांनी रेखाटलेल्या २२ चित्रांमधून भारताचा ४००० वर्षे जुना इतिहास, छत्रपती शिवाजी महाराज, राणी लक्ष्मीबाई, हिमालय आणि वाळवंट यांचे दर्शन घडते. १००० वर्षे टिकेल अशा विशेष कागदावर व शाईने लिहिलेली ही मूळ प्रत संसदेच्या ग्रंथालयात विशेष वायूच्या पेटीत सुरक्षित ठेवली असून, तज्ज्ञांकडून तिची नियमित पाहणी व जतन केले जाते, अशी दुर्मिळ माहितीही त्यांनी दिली. तसेच कायद्याच्या विद्यार्थ्यांनी अभ्यासासाठी केणती संदर्भ पुस्तके वाचावीत, याचेही त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची रूपरेषा व मान्यवरांची उपस्थिती :

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. जी. एस. पाटील लॉ कॉलेजचे प्राचार्य प्रा. कैलास पौळ यांनी स्वागतपर व प्रास्ताविक भाषण केले, तर सुरज पोपट लवटे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. या निमित्ताने घेण्यात आलेल्या संविधान प्रश्नमंजुषा स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी प्रमुख पाहुण्यांशी थेट संवाद साधत प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून आपल्या शंकांचे निरसन केले.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष एस बी पाटील, सचिव चंद्रशेखर पाटील, खजिनदार गणेश पाटील, सहयोगी संचालक सुनील शेवाळे यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक प्रा. डयना जे. व प्रा. सायली चव्हाण यांनी केले, तर एस. एस. पाटील लॉ कॉलेजच्या प्राचार्या डॉ. सोनल देशमुख यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जी. एस पाटील लॉ कॉलेज व एस.एस. पाटील लॉ कॉलेजच्या ड. सोनाली गरुड, ड. कृष्णा आघाव, ड. प्रज्वल राजुरकर, वर्षा जाधव व नीता खैरात यांच्यासह दोन्ही महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर वर्ग आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले व मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली.

पिंपरी चिंचवडमध्ये दररोज ४८० एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया; भविष्यातील गरजांसाठी ८४५ एमएलडी क्षमतेचे नियोजन

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड शहरातील वाढती लोकसंख्या आणि नागरीकरणाच्या पार्श्वभूमीवर सांडपाणी व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने नियोजनबद्ध उपाययोजना करण्यात येत आहेत. शहरात दररोज निर्माण होणाऱ्या सांडपाण्यापैकी सरासरी ४८० एमएलडी सांडपाण्यावर महापालिका आणि खासगी मैला शुद्धीकरण केंद्रांद्वारे (एसटीपी) प्रक्रिया केली जात आहे. उर्वरित सांडपाण्यावरही प्रक्रिया करता यावी, यासाठी नवीन एसटीपी प्रकल्पांची उभारणी आणि भविष्यातील क्षमतावाढीचे नियोजन करण्यात आले आहे.

पिंपरी चिंचवड शहराला दररोज सुमारे ६५० एमएलडी पाणीपुरवठा केला जातो. त्यापैकी अंदाजे ८० टक्के म्हणजेच सुमारे ५२० एमएलडी सांडपाणी निर्माण होते. या सांडपाण्यापैकी महापालिकेच्या एसटीपी केंद्रांद्वारे सरासरी ४०० एमएलडी, तर खासगी एसटीपी केंद्रांद्वारे सरासरी ८० एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. अशा प्रकारे दररोज एकूण सुमारे ४८० एमएलडी सांडपाणी प्रक्रियेतील उर्वरित सुमारे ४० एमएलडीची तूट भरून काढण्यासाठी महापालिकेने नवीन प्रकल्प हाती घेतले आहेत. चिखली स्मशानभूमीजवळ २० एमएलडी क्षमतेचे एसटीपी उभारण्याचे काम सुरू आहे. तसेच चिखली येथील रिव्हर रेसिडेन्सी परिसरात ४० एमएलडी क्षमतेचे एसटीपी उभारण्यासाठी कार्यादेश देण्यात आला आहे. या प्रकल्पांमुळे शहराच्या सांडपाणी प्रक्रिया व्यवस्थेला अधिक बळकटी मिळणार आहे.

२०३१ आणि २०४१ च्या गरजांचा विचार करून दीर्घकालीन नियोजन

शहराची भविष्यातील वाढती लोकसंख्या आणि त्यानुसार निर्माण होणाऱ्या सांडपाण्याचे प्रमाण लक्षात घेऊन महापालिकेने सिव्हरेज मास्टर प्लॅन तयार केला आहे. या आराखड्यानुसार सन २०३१ पर्यंत एकूण ३३५ एमएलडी क्षमतेची नवीन मैला शुद्धीकरण केंद्रे उभारण्याचे प्रस्तावित आहे. त्याचप्रमाणे सन २०४१ पर्यंतच्या गरजांचा विचार करून आणखी ५१० एमएलडी क्षमतेची एसटीपी केंद्रे उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे आगामी काळातील लोकसंख्यावाढ आणि सांडपाण्याचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन महापालिका दीर्घकालीन पातळीवर पायाभूत सुविधा विकसित करीत आहे.

सर्व विद्यमान एसटीपी केंद्रे कार्यरत

महापालिकेच्या सांडपाणी व्यवस्थापन यंत्रणेतील सध्या अस्तित्वात असलेली सर्व एसटीपी केंद्रे कार्यरत आहेत. पवना, इंद्रायणी आणि मुळा नदीच्या पाण्याचे प्रदूषण रोखण्यासाठी सांडपाण्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करणे महत्त्वाचे असून, त्यासाठी महापालिकेच्या माध्यमातून विद्यमान यंत्रणा सक्षम ठेवण्यासोबतच नवीन प्रकल्पांची उभारणी आणि भविष्यातील क्षमतावाढीवर भर देण्यात येत आहे. शहरातील पर्यावरण संवर्धन, नदी प्रदूषण नियंत्रण आणि नागरिकांना सक्षम नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सांडपाणी व्यवस्थापन हा महापालिकेच्या प्राधान्यक्रमातील महत्त्वाचा विषय आहे. वाढत्या शहराच्या गरजांनुसार पायाभूत सुविधांचा विस्तार करण्यासाठी महापालिका सातत्याने प्रयत्नशील आहे.

शहराचा विस्तार आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता सांडपाणी व्यवस्थापनाची यंत्रणा अधिक सक्षम करणे ही महापालिकेची प्राथमिकता आहे. पवना, मुळा आणि इंद्रायणी या नद्यांचे पर्यावरणीय संवर्धन आणि प्रदूषण नियंत्रणासाठी सांडपाण्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया होणे आवश्यक आहे. यासाठी सध्याची यंत्रणा सक्षम ठेवण्यासोबतच भविष्यातील गरजांचा विचार करून नवीन एसटीपी प्रकल्पांचे नियोजन करण्यात आले आहे. शहराच्या शाश्वत विकासासाठी पर्यावरणपूरक पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर महापालिकेचा भर राहणार आहे.

– डॉ.विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

संविधान दिनी प्रथम नगराध्यक्षांची गैरहजेरी; खोपोलीकरांच्या मनात संतापाची ठिणगी!

शहरात संविधान दिन, तर नगराध्यक्ष ऑस्ट्रेलियात? कुलदीपक शेंडेंच्या अनुपस्थितीवरून राजकीय वादंगाची शक्यता!

खोपोली । प्रतिनिधी

खोपोली शहराला प्रथम नगराध्यक्ष मिळाल्यानंतर शहराच्या विकासाच्या आणि लोकाभिमुख कारभाराच्या मोठ्या अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केल्या होत्या. मात्र, भारतीय संविधानाचा गौरव करणाऱ्या संविधान दिनासारख्या महत्त्वपूर्ण दिवशी प्रथम नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे (शिंदे गट) यांच्या कथित गैरहजेरीवरून शहरात नाराजी व्यक्त होत असल्याची चर्चा आहे.

एकीकडे संपूर्ण देश संविधान दिन साजरा करत असताना, दुसरीकडे खोपोलीच्या प्रथम नगराध्यक्षांची उपस्थिती नेमकी कुठे होती? ते ऑस्ट्रेलियात असल्याची चर्चा खरी असेल, तर संविधान दिनासारख्या ऐतिहासिक आणि राष्ट्रीय महत्त्वाच्या दिवशी शहराच्या प्रथम नगराध्यक्षांनी अनुपस्थित राहण्यामागचे कारण काय? हा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

संविधान दिन केवळ औपचारिक कार्यक्रम नाही!

भारतीय संविधान हे देशाच्या



लोकशाहीचे, समतेचे, स्वातंत्र्याचे आणि बंधुतेचे प्रतीक आहे. अशा दिवशी शहराच्या प्रथम नागरिकांकडून किमान उपस्थितीची आणि संविधानाप्रती आदर व्यक्त करण्याची अपेक्षा असणे गैर नाही. नगराध्यक्षपद हे केवळ सत्तेचे किंवा प्रतिष्ठेचे पद नसून नागरिकांप्रती असलेल्या सार्वजनिक जबाबदारीचे प्रतीक आहे. परदेश दौरा वैयक्तिक बाब असू शकतो; मात्र सार्वजनिक पदावरील व्यक्तींच्या प्राधान्यक्रमांबाबत नागरिकांना प्रश्न विचारण्याचा अधिकार निश्चितच आहे.

नाराजीचा फटका शिंदे गटाला बसणार?

या कथित गैरहजेरीचे राजकीय पडसाद आगामी काळात उमटण्याची शक्यता नाकारता येत नाही. मावळ लोकसभा मतदारसंघाचे सन्माननीय खासदार आणि विधानसभा मतदारसंघाचे आमदार हे शिंदे गटाचे प्रमुख लोकप्रतिनिधी आहेत. त्यामुळे खोपोलीतील स्थानिक नेतृत्वाच्या वर्तनाबाबत नागरिकांमध्ये निर्माण होणारी नाराजी या लोकप्रतिनिधींसाठीही राजकीयदृष्ट्या अडचणीची ठरू शकते. नागरिकांच्या मनातील असंतोष आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये मतदानातून व्यक्त होणार, तर त्याची राजकीय किंमत संबंधित नेतृत्वाला मोजावी लागणार आहे.

शेवटी प्रश्न एकच...

खोपोलीकरांनी विश्वासाने प्रथम नगराध्यक्षपदाची जबाबदारी दिली. मग संविधान दिनासारख्या महत्त्वपूर्ण दिवशी शहराच्या प्रथम नगराध्यक्षांची अनुपस्थिती का? कुलदीपक शेंडे यांनी या प्रकरणावर आपली भूमिका स्पष्ट करावी. ऑस्ट्रेलिया दौऱ्याबाबतची चर्चा खरी की खोटी, हेही त्यांनी नागरिकांसमोर स्पष्ट करावे. कारण लोकशाहीत पद मोठे नसते, तर त्या पदामागची जनतेप्रती असलेली जबाबदारी मोठी असते! खोपोलीकरांचा सवाल – नगराध्यक्षांना शहरापेक्षा परदेश दौरा महत्त्वाचा की संविधान दिनाचा सन्मान?

श्रुती म्हात्रे यांच्या अभिष्टचिंतनासाठी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पनवेलमध्ये!

अल्पावधीत संघटनात्मक कार्यातून निर्माण केले स्वतंत्र स्थान; प्रदेशाध्यक्षांच्या सदिच्छा भेटीने पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा उत्साह द्विगुणित!

पनवेल । साबीर शेख

काँग्रेसच्या पनवेल शहर जिल्हाध्यक्षा श्रुती म्हात्रे यांच्या वाढदिवसानिमित्त काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी थेट पनवेल येथे उपस्थित राहून त्यांना अभिष्टचिंतनाच्या शुभेच्छा दिल्या. पक्षाच्या शिष जिल्हास्तरीय नेतृत्वाच्या कार्याची दखल घेत प्रदेशाध्यक्षांनी स्वतः पनवेलमध्ये येऊन शुभेच्छा देणे, ही राजकीय आणि संघटनात्मक वर्तुळात विशेष चर्चेची बाब ठरत आहे.

अल्पावधीतच पनवेल शहर जिल्ह्याच्या संघटनात्मक नेतृत्वाची जबाबदारी समर्थपणे सांभाळताना श्रुती ताई म्हात्रे यांनी पक्षश्रेष्ठींच्या मनात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. महिला नेतृत्वाच्या माध्यमातून पक्ष संघटना अधिक मजबूत



करण्यासाठी त्यांनी घेतलेला पुढाकार, कार्यकर्त्यांशी असलेला संवाद आणि विविध संघटनात्मक आव्हानांना सामोरे जाण्याची त्यांची कार्यपद्धती यामुळे जिल्ह्यात काँग्रेस संघटनेला नवी ऊर्जा मिळत असल्याचे चित्र आहे.

राजकारणात महिलांना नेतृत्वाची संधी मिळणे ही केवळ प्रतिनिधित्वाची बाब नसून, त्या संधीचे संघटनात्मक सामर्थ्यात रूपांतर करणे अधिक महत्त्वाचे असते. श्रुती म्हात्रे यांनी अल्पावधीत केलेल्या कार्यातून महिला नेतृत्वाची संघटनात्मक क्षमता अधोरेखित केली आहे. अशा नेतृत्वाच्या पाठीशी पक्षाचे वरिष्ठ नेतृत्व खंबीरपणे उभे राहून प्रोत्साहन देत असल्याचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या पनवेल भेटीतून दिसून आले. यावेळी प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांनी श्रुती म्हात्रे यांचे अभिष्टचिंतन करून त्यांना पुढील राजकीय आणि सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. प्रदेशाध्यक्षांच्या या सदिच्छा भेटीमुळे पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. त्यांच्या स्वागतासाठी काँग्रेसचे विविध पदाधिकारी, स्थानिक नेते आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विशेष म्हणजे, पक्षाच्या प्रदेशस्तरीय नेतृत्वाने जिल्हास्तरीय कार्यकर्त्यांच्या पाठीशी प्रत्यक्ष उपस्थित राहून भावनिक आणि संघटनात्मक पाठबळ देणे, ही बाब कार्यकर्त्यांचे मनोबल वाढवणारी ठरली. प्रदेशाध्यक्षांच्या या आपुलकीच्या भूमिकेचे पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांकडून विशेष कौतुक होत आहे. राजकारणात पद मिळविण्यापेक्षा त्या पदाच्या माध्यमातून संघटनेला बळ देणे आणि कार्यकर्त्यांचा विश्वास संपादन करणे महत्त्वाचे असते. श्रुती म्हात्रे यांच्या वाढदिवसानिमित्त प्रदेशाध्यक्षांनी दिलेली ही सदिच्छा भेट त्यांच्या संघटनात्मक कार्याला मिळालेल्या प्रोत्साहनाची आणि पक्षातील नेतृत्व व कार्यकर्ते यांच्यातील समन्वयाची प्रचिती देणारी ठरली.

वाढदिवसाचे औचित्य साधत संदेशभाई पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे जल्लोषात उद्घाटन!

दहिसर । साबीर शेख

शिवसेना पक्षाचे प्रमुख नेते तथा माजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आणि कार्यसम्राट आमदार राजेश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष संघटन अधिक बळकट करण्यासाठी युवा नेतृत्व, शिवसैनिक व सामाजिक कार्यकर्ते संदेशभाई पाटील सातत्याने सक्रिय आहेत. युवकांचे



प्रेरणास्थान खासदार श्रीकांत शिंदे यांच्या कार्यपद्धती नुसार सामाजिक बांधिलकी, जनसेवेची तळमळ आणि युवकांना सोबत घेऊन काम करण्याच्या त्यांच्या तळमळ पाहता संदेश पाटील यांची परिसरात स्वतःची वेगळी ओळख निर्माण झालेली पहायला मिळत आहे. सामाजिक अडचणी सोडविणे, रोजगारविषयक प्रश्न, क्रीडा उपक्रम तसेच विविध सण-उत्सवांच्या माध्यमातून युवकांना एकत्र आणत समाजकार्यात योगदान देणाऱ्या संदेशभाई पाटील यांच्या कार्यकर्तृत्वाला जनते कडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

याच जनविश्वासाला अधिक व्यापक स्वरूप देत नागरिकांच्या समस्या, तक्रारी, सूचना आणि विविध प्रश्नांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे, तसेच जनतेशी थेट संवाद साधता यावा, या उद्देशाने शनिवार, दिनांक २८ नोव्हेंबर रोजी संदेशभाई पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन मोठ्या जल्लोषात आणि उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. यावेळी शिवसैनिक, युवक, सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

या अभिष्टचिंतन शुभेच्छा म्हणून आमदार राजेश मोरे यांनी संदेश पाटील यांच्या सामाजिक व संघटनात्मक कार्याचे दूरध्वनी द्वारे विशेष कौतुक केले. जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने धावून जाणारे, सर्वसामान्यांच्या अडचणींना वाचा फोडणाऱ्या शिवसैनिकांचा आदर्श संदेश पाटील यांनी घेतला असून जनतेचा त्यांना मोठा पाठिंबा मिळत आहे. त्यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून जनसेवा घडावी म्हणून त्यांच्या राजकीय पुढील वाटचालीसह त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी ठाणे जिल्हा संपर्क प्रमुख नगरसेवक महेश गायकवाड व कामगार नेते प्रभुदास भोईर यांनीही जन्मदिनानिमित्त अभिष्टचिंतन शुभेच्छा दिल्या तसेच त्यांच्या पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी संदेशभाई पाटील यांनी आपली भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, पक्ष नेतृत्वाच्या विचारधारेनुसार ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या तत्त्वावर काम करण्याचा आपला प्रामाणिक प्रयत्न राहील. जनतेच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून सदैव उपलब्ध राहणार असून, नागरिकांची साथ आणि आशीर्वाद लाभल्यास सर्वांना सोबत घेऊन विकासाची व जनसेवेची वाटचाल अधिक गतिमान करू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच कार्यक्रमाला उपस्थित राहून शुभेच्छांचा वर्षाव करणाऱ्या सर्व मान्यवर, शिवसैनिक, युवक आणि नागरिकांचे त्यांनी आभार मानले.

विलीनीकरणाची कथित चर्चा; राष्ट्रवादीकडे मुख्यमंत्रीपदाची संधी? राजकीय वर्तुळात खळबळ!

सोशल मीडियावरील 'प्रसंग आला बाका, तेव्हा विचारधारा सोडून गेले काका' या मिश्किल टिप्पणीने वेधले लक्ष!

राजकीय विशेष विश्लेषण । साबीर शेख

महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या संभाव्य विलीन